**बिसेन डेन्टल केअर**
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक २८ | बुधवार, दि.१९ जून २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# गौणखनिज उत्खनन जिल्हा प्रशासन व कंपनीचे साटेलोटे

**गोंदिया:-** जिल्ह्यात महामार्गाचे बांधकाम करताना परिसरातील नदी, नाले आणि तलावांच्या खोलीकरणातून माती-मुरूम मिळविला. त्यामुळे बांधकाम खर्चात कपात होऊन महामार्ग परिसरात समृद्ध भूपृष्ठीय जलसाठे आणि पुनर्भरण प्रक्रियेतून भूजल-साठे तयार होत असले तरी किती ब्रास गौणखनिजाचे खरं उत्खनन करण्यात आले.

मंजुरीपेक्षा अधिक तर झाले नाही ना याचा शोध मात्र कुठेच घेतला जात नसल्याने शासकीय यंत्रणेवर खासगी कंत्राटदार आर्थिक प्रलोबनातून वरचढ ठरत आहेत. अनेक ठिकाणाहून मंजुरीपेक्षा अधिक उत्खनन होत असतांना महसूल व खनिकर्म विभाग डोळेझाक करुन बसलेला आहे. त्यातच जून महिना आलेला असून काही दिवसातच पावसाला सुरवात होणार आहे, अशाही परिस्थितीत खोदकाम झालेल्या जागेची मोजणी महसूलसह पाटबंधारे विभागाने न केल्याने अचानक पाऊस आल्यास खोदकामाचे खरं क्षेत्र मोजताच येणार नाही, हे ठाऊक असताना सुध्दा जिल्हाधिकारीपासून सर्वच यंत्रणा गप्प का अशा प्रश्न उपस्थित झालेला आहे.

रस्त्यांचे बांधकाम करताना मुरूम, रेती, मातीची गरज पडते. त्यासाठी अधिकचा खर्च करावा लागतो. महामार्गाचे काम सुरू आहे त्याच भागातील गाव तलाव, पाझर तलाव, नदी, नाले, शेततळ्यांचे रुंदीकरण आणि खोलीकरण करून त्यातील मुरूम, माती महामार्गांच्या बांधकामासाठी वापरल्यास खर्चात कपात होऊन जलसंवर्धनावर वेगळा खर्च होणाऱ्या निधीचा व्यय थांबू शकते. हा मुलमंत्र स्विकारून देशभरातील रस्ते बांधणीकरीता तलाव, नदी नाल्यातील मुरूम मातीचा वापर करण्यात येत आहे.

- गौणखनिज खोदकामाच्या ठिकाणी नोंदवहीची वाणवा
- गौणखणिज उत्खनन मोजणीकडे अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष
- रजेगावच्या नागरिकांनी जिल्हा प्रशासनावर केला आरोप

गोंदिया जिल्ह्यातही या नियमाचे पालन जिल्हाधिकारी यांचे आदेशाने रस्ता तयार करणारी कंपनी करीत आहे.मात्र ज्या कंपनीला तलावातून माती व मुरूमचे उत्खणन करण्याची परवानी देण्यात आली, त्या कंपनीने दर आठवड्याला आपला अहवाल संबधित विभागाला सादर करणे आवश्यक असते.तसेच त्या कार्यक्षेत्रातील तहसिलदार, तलाठी व तलाव ज्या विभागातंर्गत येते त्या विभागाच्या अभियंत्यापासून कार्य. अभियंत्यापर्यंत सर्वांना आठवड्याला भेट देऊन त्याची नोंद ठेवणे आवश्यक आहे.मात्र गोंदिया जिल्ह्यात या सर्व बाबींना फाटा देण्यात येत असल्याचे चित्र प्रत्यक्ष खोदकामस्थळावर भेट दिल्यानंतर बघावयास मिळाले.

बालाघाट-गोंदिया या राष्ट्रिय महामार्ग क्रमांक ७५३ च्या चौपदीकरणाचे काम सध्या सुरु असून गोंदिया तालुक्यातील रजेगाव व खमारी येथील जिल्हा परिषदेच्या तलावातून माती व मुरुमाचे मोठया प्रमाणात उत्खनन सुरु आहे.त्याठिकाणी उत्खनन करणाऱ्या यंत्रणाकडे कुठलीच नोंदवही ठेवली जात नाही.

तसेच त्यांच्या वाहनामार्फेत दररोज वाहतूक होत असलेल्या गौणखनिज नोंदवहीची तपासणी सुध्दा संबधित तहसिलदार, तलाठी, अभियंतापासून कार्यकारी अभियंता यांनी केले नसल्याचे प्रत्यक्ष पाहणीत आढळून आले.

रजेगाव येथील नागरिकांनी तर ज्याप्रमाणे तलावाचे खोलीकरण करण्यात येत आहे, त्याकडे बघितल्यास सदर तलाव हे भविष्यात मृत्यूचे डोह ठरणार अशी भिती व्यक्त केली आहे. तसेच रजेगाव ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत सुध्दा तलाव खोलीकरणाचा प्रस्ताव समंत करण्यता आला नसल्याचे नागरिकांचे म्हणने आहे.

जिल्हाधिकारी स्वमर्जीनेच ग्रामसभांचे अधिकार हिरावून तलावांच्या खोलीकरणाला परवानगी देत असल्याचेही नागरिकांचे म्हणने आहे. रजेगाव येथील तलाव खोलीकरणातून किती ब्रास मातीमिश्रीत मुरुमाचे उत्खणन करण्यात



आले, याबदद्ल तलाठी बालाराम बनोठे यांना विचारणा केली असता आपण अद्याप त्याठिकाणी भेट दिली नसल्याचे सांगितले.यावरुन साटेलोटे असल्याचेच स्पष्ट दिसून येत आहे.

तर गोंदिया जिल्ह्यातील रस्ते बांधकामात किती ठिकाणी रस्तेबांधकाम कंपनीला माती, मुरूम उत्खननाची परवानगी देण्यात आली.दिलेल्या परवानगीनुसार किती ब्रास गौणखनिजाचे उत्खनन झाले याबद्दल जिल्हा खनिकर्म अधिकारी सचिन वाढवे यांना विचारणा केल्यावर माहिती देण्यास सध्या वेळ नाही असे सांगत माहिती देणे टाळले.

तर जिल्हा परिषदेच्या लघु पाटबंधारे विभागातंर्गत येत असलेल्या खमारी व रजेगाव येथील तलावातून माती मुरूमाचे उत्खनन गेल्या महिन्याभरापासून सुरु असल्याने किती ब्रास गौणखनिजाचे उत्खनन झाले याबद्दल कार्यकारी अभियंता सत्यजित राऊत यांना विचारणा केली असता त्यांनी संबधित काम बघणारे अधिकारी रजेवर असल्याने आपण काहीच माहिती देऊ शकत नाही असे म्हणून झटकले.

# ओबीसी आरक्षण बचाव,उपोषणकर्ते लक्ष्मण हाकेंची तब्येत बिघडली




**जालना :** राज्यात आरक्षणाच्या मुद्द्यावरुन वातावरण चांगलंच तापलं आहे.मनोज जरांगेच्या उपोषणाची दखल घेत राज्य सरकारने मराठा आरक्षणाच्या मागण्यांसाठी १ महिन्यांचा अवधी मागितला. त्यानंतर, मनोज जरांगे यांनी आपलं उपोषण मागे घेतले. मात्र, दुसरीकडे ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही, याची गॅरंटी द्या, अशी मागणी करत लक्ष्मण हाके वडीगोद्री गावात उपोषणाला बसले आहेत. गेल्या २ दिवसांपासून त्यांच्या उपोषणाला पाठिंबा वाढत असून त्यांनी पाणीही घेणे बंद केले आहे.

त्यामुळे, उपोषणकर्ते लक्ष्मण हाके यांची प्रकृती बिघडली असून आज डॉक्टरांनी त्यांची तपासणी केली. रक्तदाब वाढत असल्याने हाके यांना ईसीजी लावण्यात आला असून कार्यकर्त्याकडून लक्ष्मण हाके यांना पाणी पिण्यासाठी मोठा आग्रह केला जातोय, यावेळी भावुक होऊन ओबीसी कार्यकर्त्यांकडून घोषणाबाजीही केली जात आहे.

ओबीसी समजाच्या न्याय व हक्कासाठी आपलं उपोषण आहे, असे म्हणत लक्ष्मण हाके यांनी ५ दिवसांपासून उपोषणाला सुरुवात केली आहे. त्यातच, गेल्या २ दिवसांपासून पाणी पिणेही बंद केले आहे. त्यामुळे, त्यांची प्रकृती बिघडत चालली असून अशक्तपणाही आला आहे. लक्ष्मण हाके यांच्या शरीरातील शुगर आणि पाणीपातळी खालावली, चक्कर येत असल्याने डॉक्टरांच्या पथकाकडून त्यांना उपचाराचा आग्रह करण्यात आला.

मात्र, हाके यांच्याकडून उपचार घेण्यास नकार देण्यात आला आहे. तर, डॉक्टरांनी सलाईन लावण्याची विनंती केली, पण सलाईन घेण्यासही त्यांनी नकार देत आपलं प्राणांतिक उपोषण सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे, ओबीसी समाज बांधवांकडून हाके यांच्या उपोषणस्थळी गर्दी होत आहे.

ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके आणि त्यांचे सहकारी नवनाथ वाघमारे यांच्या उपोषणाचा आजचा सहावा दिवस असून जिल्हा शल्य चिकित्सकाच्या पथकाने आज उपोषणस्थळी जाऊन त्यांच्या शारिरीक प्रकृतीची तपासणी केली. हाके यांच्या शरिरातील शुगर आणि पाणी पातळी खालवल्यामुळे त्यांना चक्कर येत असल्याचं डॉक्टरांनी सांगितले. दरम्यान त्यांना उपचाराची गरज असल्याचं डॉक्टरांनी म्हटले आहे. मात्र, डॉक्टरांच्या आग्रहानंतरही हाके यांनी उपचारास नकार दिला.

**मुंडे बंधु-भगिनींची उपोषस्थळी भेट**

लक्ष्मण हाके यांच्या उपोषणाला राज्यभरातून पाठिंब वाढत असून बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे आणि माजी मंत्री पंकजा मुंडे यांनीही सोमवारी रात्री उपोषणस्थळी भेट देऊन आपली भूमिका मांडली. माझ्या भावांच्या उपोषणातील मागण्यांचा सरकारने विचार करावा, आणि मराठा समाजाला आरक्षण देताना ओबीसींच्या आरक्षणाला कसा धक्का लागणार नाही, हे समजावून सांगावं, अशी मागणही पंकजा मुंडेंनी केली. तर, उपोषणकर्त्यांच्या मागण्या मुख्यमंत्र्यांसह सरकारसमोर मांडणार असल्याचं धनंजय मुंडेंनी म्हटले आहे.

# राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन २७ जून ते १२ जुलै या कालावधीत मुंबईत



**मुंबई:-** राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन मुंबई येथे २७ जून ते १२ जुलै २०२४ या कालावधीत होणार आहे. राज्याचा अतिरिक्त अर्थसंकल्प २८ जून रोजी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मांडण्यात येणार आहे.

विधानभवन, मुंबई येथे विधानसभा आणि विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली. यावेळी अधिवेशनाच्या कामकाजाबाबत चर्चा करण्यात आली. या बैठकीला विधानसभा अध्यक्ष ?ड.राहुल नार्वेकर, विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गो?हे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, विधानपरिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार (दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे) यांच्यासह कामकाज सल्लागार समितीचे सदस्य, विधिमंडळ सचिव जितेंद्र भोळे आदी मान्यवर उपस्थित होते. पावसाळी अधिवेशन २७ जून ते शुक्रवार, १२ जुलै २०२४ या कालावधीत होणार असून, एकूण तेरा दिवस कामकाज चालणार आहे. शनिवार २९ जून २०२४ सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी विधिमंडळाचे कामकाज सुरू राहील, असे या बैठकीत ठरविण्यात आले.

आगामी काळात महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत, यामुळे या अधिवेशनाकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष आहे. राज्यात महाविकास आघाडीला लोकसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणात जागा मिळाल्या आहेत, तर महायुतीला अपेक्षीत जागांवर विजय मिळवता आलेला नाही. यामुळे आता महायुती आणि महाविकास आघाडीनेही विधानसभा निवडणुकांची जोरदार तयारी सुरू केली आहे.

या अधिनेशनामध्ये राज्यातील दुष्काळ आणि अन्य विषयांवर चर्चा होणार असल्याची चर्चा आहे, तर मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा उपोषण सुरू केले आहे. यामुळे मराठा आरक्षणाचा मुद्दा पुन्हा एकदा विधिमंडळात गाजणार असल्याची चर्चा आहे.

# १९ जूनपासून गोंदियात पोलीस शिपाई पदभरती,आमिषाला बळी पडू नका-एसपी पिंगळे

**गोंदियाः-** गोंदिया पोलीस दलामार्फत पोलीस शिपाई भरती २०२२-२०२३ (प्रत्यक्ष भरती प्रक्रिया २०२४) ११० जागांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येणार असून सदर भरती करिता मैदानी (शारिरीक) चाचणीची तारिख १९ जून ते ४ जुर्ले २०२४ या कालावधीत राहणार असल्याची माहिती गोंदियाचे पोलीस अधिक्षक निखिल पिंगळे यांनी पत्रपरिषदेत दिली. ही भरती कारंजा येथी पोलीस मुख्यालयातील पटांगणावर आयोजित करण्यात आलेली आहे. पत्रपरिषदेला अतिरिक्त पोलीस अधिक्षक नित्यानंद झा, गोंदिया शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक सुर्यवंशी उपस्थित होते.



सविस्तर वृत्त असे की, गोंदिया पोलीस शिपाई पदाकरीता सुमारे ८००० उमेदवारांनी अर्ज सादर केले आहे. त्या उमेदवारांची शारीरीक चाचणी परिक्षा १९/०६/२०२४ ते ०४/०७/२०२४ या कालावधीत पुर्ण करण्यात येणार आहे. पोलीस शिपाई पदाकरीता दरदिवशी सरासरी ३०० उमेदवारांची शारिरिक (मैदानी) चाचणी घेण्यात येणार आहे.

सर्व उमेदवारांना पोलीस शिपाई पदाच्या मैदानी (शारिरीक) चाचणी परीक्षेचे प्रवेशपत्र हे महाआयटी विभागामार्फत ऑनलाईन पद्धतीने डाऊनलोड करण्यास उपलब्ध करुन देण्यात आले आहे. तरी, सर्व उमेदवारांनी आपले मैदानी (शारिरीक) चाचणी परीक्षेचे प्रवेशपत्र https://policerecruitment2024.mahait.org या वेबसाईटवरुन डाऊनलोड करुन घ्यावे तसेच प्रवेशपत्रावर नमूद असलेल्या मैदानी (शारिरीक) चाचणी परिक्षेची तारिख लक्षात घेऊन मैदानी (शारिरीक) चाचणी करीता आवश्यक कागदपत्रासह पोलीस मुख्यालय गोंदिया (कारंजा) येथे हजर रहावे असे आवाहन जिल्हा पोलीस अधिक्षक निखिल पिंगळे यांनी केले आहे.

सदर पदभरती प्रक्रिया ही अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन पुर्णपणे पारदर्शक पध्दतीने करण्यात येणार असुन यामध्ये उमेदवारांची छाती-उंची या शारीरीक मोजणीकरीता पीएसटी (PST) Digital Physical Standard Test तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. तसेच उमेदवारांची १६०० मी. धावणे (पुरुष), ८०० मी. धावणे (महिला), १०० मी. धावणे (पुरुष व महिला) च्या चाचणी करीता (RFID) Based Technology चा वापर करण्यात येणार आहे.

यासोबतच गोळा फेक चाचणीकरीता Prism Technology चा वापर करण्यात येणार आहे. मैदानी (शारिरीक) चाचणीमध्ये उत्तीर्ण होवुन लेखीपरीक्षेकरीता पात्र उमेदवारांची बायोमॅट्रीक पध्दतीने हजेरी घेवुन पडताळणी करण्यात येणार आहे. जर पावसामुळे एखादे दिवशी मैदानी चाचणी होवु शकली नाही तर त्यांना पुढची सुयोग्य तारीख दिली जाईल. सोबतच काही उमदवारांना वेगवेगळया पदाकरीता एकापेक्षा जास्त ठिकाणी आणि एकाच दिवशी मैदानी चाचणी करीता हजर राहण्याची सुचना प्राप्त झाली अश्या उमेदवारांना दुसरी तारिख दिली जाईल. उमेदवारांना इतर काही अडचणी आल्यास त्याचे निरसन स्थानिक पातळीवर करण्यात येईल.

सदर पदभरती प्रक्रियेमध्ये उमेदवारांनी कोणत्याही गैरमार्गाचा वापर करु नये, असे करतांना आढळुन आल्यास उमेदवाराची उमेदवारी तात्काळ रद्द करुन त्याचेवर प्रचलित कायद्यान्वये योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. उमेदवारांनी कुठल्याही प्रलोभन किंवा आमिषाला बळी पडू नये तसेच कोणीही आमिष किंवा प्रलोभन देत असेल तर पोलीस अधीक्षक कार्यालय, गोंदिया येथील तक्रार कक्षात तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय/पोस्टे/उपपोस्टे/पोमकें येथे माहिती द्यावे असेही पिंगळे यांनी आवाहन केले आहे.

# विधानसभेच्या निवडणूकीत गोंदियासह ८०-९० जागा एनसीपी लढणार-खा.पटेल

**गोंदियाः** लोकसभा निवडणूकीच्या निकालानंतर पहिल्यांदा जिल्ह्याच्या भेटीवर आलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित गट) कार्याध्यक्ष व खासदार प्रफ्फुल पटेल यांनी येत्या विधानसभेच्या निवडणूका महायुतीसोबतच ८०-९० जागेवर लढणार असून यात गोंदिया विधानसभा मतदारसंघाकरीता आग्रही राहणार असल्याचे सांगितले. ते गोंदिया येथील नमाद महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित पत्रकारपरिषदेत बोलत होते.यावेळी माजी आमदार राजेंद्र जैन व आमदार मनोहर चंद्रिकापूरे उपस्थित होते.

लोकसभा मतदारसंघातील सहापैकी २ मतदारसंघात महायुतीच्या उमेदवाराला मिळालेल्या आघाडीतील मतामध्ये आमच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा मोठा वाटा आहे, हे विसरता येणार नसल्याचे सांगतच विधानसभेच्या निवडणूकीकरीता आम्ही गोंदिया-भंडारा जिल्ह्यातील जागावाटपात विद्यमान आमदारासह गोंदिया-तिरोडावरही विचारमंथन करणार आहोत. गोंदिया विधानसभा मतदारसंघात आजपर्यंत जिंकून आलेला आमदार हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या मतावरच आलेला असल्याने यावेळी आम्ही गोंदिया मतदारसंघाचा विचार करणार असल्याचे खा.पटेलांनी पत्रकारांच्या प्रश्नावर बोलतांना सांगितले.

लोकसभा निवडणूकीत विरोधी पक्षाने संविधान बदलणार असल्याचा मुद्दा रेठून धरला व त्या मुद्द्याला मागासवर्गीय समाजाने गृहीत धरल्याने महाराष्ट्रात एनडीएच्या महायुतीला फटका बसला.१० एप्रीलच्या सभेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना संविधान बदल प्रचारावर आपण कल्पना दिली होती, परंतू एवढा त्याचा परिणाम होईल असे वाटले नव्हते असे.

खा . प ट े ल म्हणाले.संविधानाच्या मूळ गाभ्याला कुणीही हात लावू शकत नाही आणि तो बदलू ही शकत नाही.त्यातच संसदेत अनु.जाती व जनजाती समुहाचे खासदार १०० च्या वर असल्याने संविधान बदलाच्या विषयावर ते गप्प राहणार का अशा प्रतिप्रश्न करीत विरोधी पक्षांने चुकीचा प्रचार केल्याचे म्हणाले.महाराष्ट्रात मराठा आरक्षण महायुतीने दिले,परंतू त्याचाही चुकीचा प्रचार झाल्याचे म्हणाले.

खा.पटेल यांनी भंडारा गोंदिया लोकसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित खासदार डॉ.प्रशांत पडोळे व गडचिरोली-चिमूरचे खासदार डॉ.नामदेवराव किरसान या दोघांचेही अभिनंदन करीत दोघांनी आपल्या मतदारसंघातील विकासाचे प्रश्न सोडविण्याकरीता आता पुढे यावे, आपण त्यांना नक्की सहकार्य करू असे सांगितले. लोकसभा निवडणूकीतील निकालाचे विधानसभेच्या निवडणूकीवर काहीच परिणाम होणार नसल्याचेही पटेल म्हणाले.

दोन्ही निवडणूका वेगवेगळ्या असतात,मुद्दे वेगळे असतात असे सांगत पुर्ण ताकदिने आम्ही विधानसभा लढणार असल्याचे म्हणाले. लवकरच राज्यातील सरकारचे मंत्रीमंडळ विस्तार होणार असून मंत्रिमंडळ विस्तारानंतर अधिवेशनात युवक, बेरोजगार, महिलांकरीता चांगल्या योजना अमंलात आणण्याचे काम राज्यातील सरकार करणार असल्याचेही पटेल यांनी सांगितले.



## मंत्रिपद मलाच मिळणार

**देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली. त्यांच्या मंत्रिमंडळामध्ये महाराष्ट्रातून राष्ट्रवादीकडून प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्या नावाची चर्चा होती. मात्र, राष्ट्रवादीला राज्यमंत्रीपद देऊ केल्यामुळे त्यांनी ते नाकारत कॅबिनेट मंत्रीपद पाहिजे, अशी मागणी केली होती. त्यावर भाजपने आम्ही विचार करू, असे म्हटले. त्यातच, राष्ट्रवादी काँग्रेसकडून सुनेत्रा पवार यांना राज्यसभेवर पाठवण्यात आले. आता सुनेत्रा पवार यांना राज्यमंत्रीपद दिले जाईल, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. मात्र, राष्ट्रवादीच्या कोट्यात जर कॅबिनेट मंत्रिपद आले तर ते मलाच मिळणार, असा दावा पटेल यांनी केला. योग्य वेळ आल्यावर योग्य निर्णय होईल, असेही पटेल यांनी सांगितले.**

## एलन मस्क यांनी फुकटचा सल्ला देऊ नये

**एलन मस्क यांनी ट्विट करत ईव्हीएमवर प्रश्न उपस्थित करत ईव्हीएम बंद करायला पाहिजे असे वक्तव्य केले होते. यावर खा. प्रफुल्ल पटेल यांनी एलन मस्क यांनी फुकटचा सल्ला देऊ नये. त्यांनी तिथे बसून गाड्या बनवायला पाहिजे फुकटचा सल्ला देऊ नये असे खा. पटेल म्हणाले.**




## संपादकीय

# नीटच्या पेपरफुटीने विश्वासार्हतेला तडा

डॉक्टर होण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या विश्वासाला तडा जाणारा गैरप्रकार पहिल्यांदाच देशभर गाजत आहे. प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले आहे. यावर्षी झालेली नीट यूजी परीक्षा रद्द करण्यात यावी आणि पुनर्परीक्षा घेण्यात यावी, या संदर्भात याचिका दाखल करण्यात आली. सुनावणीच्या वेळी सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने निकालानंतरच्या प्रक्रियेला तूर्तास स्थगिती देण्यास नकार दिला असला तरी, परीक्षा आयोजित करणाऱ्या नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) या संस्थेला जाब विचारला आहे. या संदर्भात नोटीस जारी करून अहवाल मागवला आहे. तसेच या परीक्षेच्या विश्वासार्हतेवर परिणाम झाला असून यावर सविस्तर उत्तर देण्यात यावे, अशी टिप्पणी न्यायालयाने लगावली आहे. पुढील सुनावणी आता ८ जुलै रोजी पार पडणार असल्याने, सर्वोच्च न्यायालय काय निर्णय देणार याकडे लक्ष लागले आहे.

एकीकडे विद्यार्थी पालकांच्या वतीने न्यायालयाचे दरवाजे ठोठावण्यात आले असताना, महाराष्ट्राचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनीही नीट परीक्षा पुन्हा घेण्यात यावी, अशी मागणी केली होती. त्यामुळे नीट यूजीच्या परीक्षेत नक्कीच गोंधळ झाला असावा, असा संशय बळावण्यास जागा निर्माण झाली. दुसरीकडे तामिळनाडूमध्ये नीट यूजी परीक्षेवरून गेल्या तीन वर्षांपासून गोंधळाचे वातावरण आहे. २०२१ मध्ये द्रमुकचे सरकार आल्यानंतर, नीट परीक्षेचा विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेवर होणाऱ्या परिणामांचा आढावा घेण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती स्थापन केली होती. या समितीने विद्यार्थी, पालक आणि नागरिकांशी संवाद साधून आणि या परीक्षेसंबंधी विस्तृत माहिती गोळा करत तिचे विश्लेषण करून एक अहवाल तयार केला. त्या समितीने नुकताच “नीट’ परीक्षेबाबत सरकारला अहवाल सादर केला आहे. हा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर, नीट परीक्षा ही गरीब विद्यार्थ्यांवर अन्याय करणारी आणि सामाजिक न्याय विरोधी असल्याचे तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांनी म्हटले आहे. वैद्यकीय शिक्षण घेण्याची इच्छा असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नीट (NEET) म्हणजे National Eligibility cum Entrance Test ही महत्त्वाची परीक्षा घेतली जाते. मेडिकल कॉलेजला याच परीक्षेतील गुणांवर मेरिट लिस्ट तयार केली जाते. एकूण ७२० मार्कांच्या या परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना योग्य पर्याय निवडून आपली उत्तरे द्यायची असतात. यामध्ये प्रत्येक बरोबर उत्तरासाठी विद्यार्थ्यांना ४ मार्क मिळतात, तर प्रत्येक चुकीच्या उत्तरामागे १ मार्क कापला जातो.

नीट परीक्षेचा निकाल ४ जूनला लागला. ओएमआर शीट फाडल्याचा आरोप होत आहे. अनेक विद्यार्थ्यांचे निकाल ऑनलाइन दाखवले जात नाहीत. अनेक विद्यार्थ्यांचे गुण कमी आहेत, म्हणजेच त्यांना ओएमआर शीटनुसार जे गुण मिळायला हवे होते, ते मिळालेले नाहीत. अशा विविध कारणांमुळे देशभरातील विद्यार्थ्यांनी या निकालावर आक्षेप घेतला. परीक्षेचे आयोजन योग्य प्रकारे करण्यात आल्याचा आरोप करत परीक्षा पुन्हा घेण्याची मागणी विद्यार्थी वर्गातून करण्यात आली. राजस्थान, हरियाणा येथील विद्यार्थ्यांनी सोशल मीडियावर या संदर्भात टाकलेल्या पोस्टनंतर, विद्यार्थ्यांच्या मनात आता आपले नक्की काय होणार हा प्रश्न पडला असेल.

संशयास्पदरीत्या समान रोल नंबर, निकाल जाहीर करण्याच्या तारखेत अचानक झालेला बदल आणि पेपर लीकचे आरोप यामुळे नीट यूजीचा यंदाचा निकाल खरा मानायचा का अशी भावना विद्यार्थी, पालकांमध्ये निर्माण झाली. कारण, नीट परीक्षेचा निकाल १४ जूनला लागेल, असे जाहीर करण्यात आले होते. पण ४ जूनला देशामध्ये सार्वत्रिक निवडणुकांचे निकाल जाहीर होत असतानाच अचानक नीट परीक्षेचा निकाल दहा दिवस आधीच जाहीर करण्यात आला. त्यामुळे संशयाची सुई निर्माण झाली. ५ मे रोजी या वर्षीची नीट परीक्षा झाली होती. या परीक्षेसाठी २४ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २३ लाख ३३ हजार विद्यार्थी परीक्षेला बसले. २०२२ मध्ये पैकीच्या पैकी गुण कोणालाही मिळाले नाहीत. २०२३ मध्ये देशभरातून फक्त दोन मुलांना असे शंभर टक्के मार्क मिळाले होते. या परीक्षेतल्या चार टॉपर्सना ७२० पैकी ७१५ मार्क मिळाले होते. यंदा मात्र ६७ विद्यार्थ्यांना ७२० पैकी ७२० गुण मिळाले आहेत. त्यामुळे या निकालात अनपेक्षित घडल्याने पेपरफुटी आणि परीक्षेच्या निकालात घोळ झाल्याचा आरोप विद्यार्थी आणि पालकांकडून केला जात आहे.

विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण व्हावा, अशा काही गोष्टी सोशल माध्यमातून जनतेमध्ये पसरल्या आहेत. अनेक नीट परीक्षेचे टॉपर्स एकाच परीक्षा केंद्रातील आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी ७१८, ७१९ गुण मिळवले, ते नीट मार्किंग योजनेनुसार अशक्य असल्याचा दावा केला गेला आहे. त्यामुळे बारावी सायन शाखेच्या उच्च माध्यमिक परीक्षेमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारेच वैद्यकीय शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावेत, या मागणीला जोर धरू लागला आहे. राज्याराज्यांनी कितीही आदळआपट केली तरीही केंद्रीय स्तरावरील नीट परीक्षेमार्फतच मेडिकल कॉलेजच्या प्रवेशाचा मार्ग जात असल्याने, नीटची जरी विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असले तरी, मेडिकलच्या प्रवेशासाठी भविष्य टांगणीला बांधलेल्या लाखो विद्यार्थ्यांपुढे मेरिट लिस्टच्या यादीत आपले नाव झळकते का? याची प्रतीक्षा करणे सध्या तरी हाती आहे.

# १७ जून ते १ जुलै दरम्यान कृषि संजीवनी पंधरवाड्याचे आयोजन

**गोंदिया :** डॉ.पंजाबराव देशमुख यांची १२५ वी जयंती निमिताने १७ जून ते १ जुलै २०२४ या कालावधीत “कृषि संजीवनी पंधरवाडा’ आयोजित करण्यात येणार आहे. या कालावधीत जिल्हाभरात प्रत्येक दिवशी महत्वाच्या मोहिमांवर विशेष भर देऊन “कृषि संजीवनी पंधरवाडा’ साजरा करावयाचा आहे. त्यानुसार १७ जून–बीजप्रक्रिया जनजागृती, १८ जून–पीएम किसान उत्सव, १९ जून–जमीन सुपिकता जागृती, २० जून–गुणवत्तापूर्ण निविष्ठांची ओळख, २१ जून–महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवड व तंत्रज्ञान प्रसार, २२ जून–पीक विमा जनजागृती, २३ जून–हवामान अनुकूल शेती तंत्रज्ञान प्रसार, २४ जून–सोयाबीन व मका लागवड तंत्रज्ञान, २५ जून–कापूस, भात व ऊस लागवड तंत्रज्ञान, २६ जून–तुर व इतर कडधान्य लागवड तंत्रज्ञान, २७ जून–कृषि महिला शेतकरी सन्मान, २८ जून–जिल्ह्यातील महित्वाच्या पिकांची कीड व रोग नियंत्रणाच्या उपाययोजना, २९ जून–शेतकरी मासिक वाचन व वर्गणीदार वाढविणे, ३० जून–प्रगतशील शेतकरी संवाद व १ जुलै रोजी कृषि दिन, अशाप्रकारे कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत.

१ जुलै रोजी स्व. वसंतराव नाईक यांच्या जन्मदिनी संपूर्ण महाराष्ट्रात कृषि दिन म्हणून साजरा केला जातो, त्या दिवशी कृषि संजीवनी मोहिमेची सांगता होणार आहे. सदर कालावधी हा खरीप पिकांच्या दृष्टीने महत्वाचा असल्याने या कालावधीत सदर मोहिमेद्वारे कृषि विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच कृषि विद्यापीठाचे शास्त्रज्ञ गावा–गावात जाऊन शेतकऱ्यांना नविन तंत्रज्ञानाचा प्रचार करणार आहेत. कृषि तंत्रज्ञानातील छोटीशी सुधारणा देखील पीक उत्पादन वाढीवर मोठा परिणाम करु शकते. तरी या कृषि संजीवनी पंधरवाड्यात विविध मोहिमांमध्ये जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग दर्शवावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी गोंदिया यांनी केले आहे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# बहुजन चळवळीच्या पुनर्रचनेची गरज

देशात नुकतीच २०२४ ची लोकसभा निवडणूक पार पडली. या निवडणुकीमध्ये एक प्रकर्षाने जाणवले कि फुलेआंबेडकरी विचारधारेचे पक्ष म्हणविणारे सारे पक्ष हे धाराशायी झाले आहेत. बहुजनवादी राजकीय पक्ष म्हटला तर त्यात मुख्यत: बहुजन समाज पक्षाचा समावेश होतो तर प्रादेशिक स्तरावर वंचित बहुजन आघाडी, राष्ट्रीय जनता दल, समाजवादी पक्ष यांचे नाव घेता येईल. परंतु राष्ट्रीय जनता दल व समाजवादी पक्ष या पक्षांना फुले शाहू आंबेडकर विचारधारेतील पक्ष म्हणता येत नाही. रिपब्लिकन पक्ष हा बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नातील पक्ष होता. या रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून बहुजनांना राजकीय सत्ताधारी बनविण्याची त्यांची योजना होती परंतु बाबासाहेब आंबेडकरांच्या पश्च्यात या पक्षाची अनेक शकले झाली. आजच्या स्थितीमध्ये तो विविध गटात विभाजित होवून अस्तित्वहीन झालाय. निवडणूक न लढता मंत्री होणारे रामदास आठवले हे केवळ निवडणूक प्यादे असून ते नगर–सेवक म्हणून तरी निवडून येतील का? हा एक प्रश्नच आहे. कांशीराम यांनी बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारापासून प्रेरणा घेवून बामसेफ हि सामाजिक संघटना व बहुजन समाज पक्ष स्थापन केला. त्यांनी देशातील बहुजन जनतेला जागृत करीत निवडणुकांच्या माध्यमातून अनेक राज्यात बसपाचे आमदार व खासदार निवडून आणले. तर उत्तर प्रदेश सारख्या राज्यात बहुजन पक्षाची सत्ता स्थापण्यात यश मिळविले. बाबासाहेबांचे विचार व त्यावर कांशीराम यांचेकडून करण्यात आलेली अंमलबजावणी हा आता इतिहासाचा भाग झालाय.

वर्तमानकाळात बहुजन समाज पक्ष हा मायावतीजीच्या मकडजालमध्ये बंदिस्त आहे. कांशीराम यांच्या निर्वाणानंतर कित्येक मासबेस लीडर असलेल्या कार्यकर्त्यांना पक्षातून हाकलून देण्यात आले. २००७ च्या विधानसभा विजयानंतरच्या कार्यकलापानंतर जे आर्थिक व्यवहार झाले तेव्हापासून केंद्रातील सरकारे आयकर विभाग, इडी व सीबीआयचा धाक दाखवून त्यांना आपल्या सोयीप्रमाणे वागावयास भाग पाडते. दलीतावर जे अत्याचार होतात त्याबाबत मायावती केवळ ट्वीट द्वारे भावना व्यक्त करीत असते. जनतेमध्ये न जाण्याच्या नादातून बसपाची कोअर वोटबँक दूर झाल्यामुळे त्यांचे विधानसभा २०१९ व लोकसभा २०२४ तील प्रतिनिधीत्व शून्यावर आले. हा बसपाचे राजकीय क्षितिजावरुन नष्ट होण्याचे संकेत आहेत. महाराष्ट्रात तीच भूमिका प्रकाश आंबेडकर इमान इतबारे पार पाडत लोकांना भावनात्मक मुद्यात गुंतवून भारतीय जनता पक्षाच्या सोयीची भूमिका घेताना दिसले. वंचितचे उमेद–वार जिंकण्याचे आकडे नसताना स्वतंत्रपणे लढविण्याची भूमिका विक्षिप्तपणाची होती. त्यांच्या या भूमिकेमुळे २०१९ व २०२४ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाला महाराष्ट्रात अधिकच्या जागा प्राप्त झाल्या. या उलट वंचित आघाडी काँग्रेस प्रणीत तिसऱ्या आघाडीसोबत असते तर प्रकाश आंबेडकर व त्यांचे काही सहकारी २०१९ व २०२४ च्या संसदेमध्ये दिसले असते व त्यांना आपला पक्ष देशात पसरविता आला असता.

### जनता विरुध्द नेते अशी स्थिती

बहुजन वर्गाची राजकीय सत्ता हातात घेण्याची भाषा बसपाच्या स्थापनेपासूनच करण्यात येत होती. कांशीरामजींच्या वैराग्यपूर्ण वागण्याने बहुजन समाजामध्ये सत्ताधारीपणाचा




जोश निर्माण झाला. आता तशी परिस्थिती नसून जनता विरुध्द नेते अशी स्थिती निर्माण झाली आहे. उत्तर प्रदेशात लोकसभा २०१९ च्या निवडणुकीत बसपा व सपाच्या युतीने लाभार्थी योजना व पुलवामा घटनेतून निर्माण केलेल्या राष्ट्रभक्तीला छेद देत १५ जागावर विजय प्राप्त केला होता. युतीचा हा टेम्पो मायावतीला कायम राखता आला नाही. तिच्या युती तोडण्याच्या निर्णयापासूनच उत्तर प्रदेश व इतर राज्यातील बसपाचा मतदार मायावतीपासून दूर होवू लागला. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये बसपाला केवळ एका जागेवर विजय प्राप्त होत १३ टक्के पर्यंत मतांची घसरण झाली. यातून धडा न घेता परत लोकसभा २०२४ च्या निवडणुकांमध्ये इंडिया आघाडी सोबत युती न करता मायावतींनी स्वबळावर निवडणुका लढविल्या. परिणामी बहुजन मतदारांनी मायावतीला शून्यावर आणून इंडिया आघाडीला मोठ्या प्रमाणात मते दिली. या निवडणुकीत बसपाला उत्तर प्रदेश मध्ये केवळ ९.३९ टक्के मते प्राप्त झाली. लोकसभा २०१४ ते २०२४ पर्यंत बहुजन समाज पक्षाची मतांची घसरण १०.३८ टक्क्यापर्यंत झाली. महाराष्ट्रात सुध्दा याच इतिहासाची पुनरावृत्ती झाली. बहुजन जनता व बुद्धीवंताचा कल भाजप विरोधी असतानाही प्रकाश आंबेडकरानी युती न करता स्वतंत्र लढण्याची भूमिका घेतली. परिणामी वंचित पक्षासोबत सहानुभूती असणाऱ्या मतदारांनी आपले मतदान तिसऱ्या आघाडीकडे वळवीले. वंचित बहुजन आघाडीला लोकसभा २०१९ ला ६.९८ टक्के (३७,४३,५६०) मतदान तर २०२४ ला ३.६४ टक्के (१५,९५,४०१) प्राप्त झाली. मतांची अर्ध्यावर झालेली घसरण हा सहानुभूतीकार मतदारांनी वंचितला दाखवलेली विरो–धात्मक नकारात्मकता होती हे लक्षात घेतले पाहिजे. नागपूरमध्ये आंबेडकराईट पार्टी ऑफ इंडिया या पक्षाचे पक्षप्रमुख विजय मानकर यांना केवळ ६१० व्होट प्राप्त झाली. तीच अवस्था रिपब्लिकन पार्टी, बहुजन मुक्ती पार्टी व पीपल्स पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्राटीक) या पक्षांची झाली. तर दुसरीकडे याच निवडणुकीमध्ये एकाच घरात राहणाऱ्या तीन भावंडाचे (प्रकाश आंबेडकर, आनंद आंबेडकर व भीमराव आंबेडकर) वेगवेगळे तीन पक्ष दिसून तिघेही आपल्या स्वतंत्र पक्षातर्फे उभे असल्याचे चित्र दिसले. एका दृष्टीने हि निवडणूक संविधान समर्थक बहुजन जनता विरुध्द संधिसाधू नेते अशी होती. मायावती, प्रकाश आंबेडकर व इतर नेत्यांच्या एकांगी निर्णयाचा जनतेने सपशेल पराभव केलाय.

### जनता नव्या नेतृत्वाच्या शोधात

मागील दशकापासून फुले–शाहू–आंबेडकरवादी जनता हि प्रस्थापित नेत्यांच्या वागणुकीवर लक्ष ठेवून होती. त्यांच्यावर होणारे अन्याय, स्त्रीयावरील बलात्कार, घरावर चालणारे बुलडोझर, ऐन पावसाळ्यात व भर उन्हात झोपड्यावर चालणारे हा–तोडे, प्रस्थापित व्यवस्थेविरोधात बोलल्यानंतर जाणाऱ्या नोकऱ्या, मिशी ठेवण्यावरून होणारी हत्याकांडे, वाढत चाललेली शैक्षणिक फी, बेरोजगारी व खाजगीकरणाच्या माध्यमातून समाप्त करण्यात येत असलेल्या नोकऱ्या अशा प्रकारच्या अनेक प्रश्नावर तथाकथित नेत्यांनी न्याय मिळवून देण्यासाठी कधीच संघर्ष केलेला दिसला नाही. मात्र पाच वर्ष बिळात लपून बसलेले नेते केवळ निवडणूकांच्या तोंडावर बाहेर येवून जनतेला राजकीय सत्तेचा भावनात्मक मुद्दा बनवून मताचा जोगवा मागतात. नेत्यांचा हा स्वार्थ हेतू जनतेने पुरता ओळखल्यामुळे ती आता नव्या नेतृत्वाच्या शोधात आहे. उत्तर प्रदेशातील नगीना या निर्वाचन क्षेत्रातून निवडून आलेले चंद्रशेखर आझाद यांच्याकडे काही प्रसार माध्यमे बोट दाखवू लागली आहेत. परंतु जनतेने नेतृत्वाचा शोध व्यक्तीकेंद्रित न करता संघटन व्यवस्थेला आपला नेता मानून संघटनेचे मेसेंजर निर्माण करीत भविष्याची वाटचाल केली पाहिजे.

### बहुजन चळवळीची पुनर्रचना कशी होईल

बहुजन चळवळ हि व्यक्तिश्रेष्ठ संधीसाधुत्व, वर्चस्वपणा, अहंकार व अंधभक्ताच्या जाळ्यात सापडली असून त्यात त्याग, निष्ठा, विश्वास, तत्वविचार व प्रामाणिकपणा याचा अभाव दिसतोय. ती सामाजिक व राजकीय दृष्ट्या अनेक गटात विभागली आहे. स्पष्ट शब्दात, राजकीय पक्षाचे निर्माण झालेले अनेक गटतट, बामसेफची झालेली शकले, नेतृत्वाचा हव्यास आणि माझ्यापेक्षा कोणी मोठा नाही या वासनेतून बहुजन चळवळ डबघाईस पावली असून ती ध्येयहीन अंताच्या टोकावर उभी आहे. एकता व लक्ष्याअभावी पुढेही तिचे विभाजन होत ती अशीच अनेक शतके चालत राहील. तात्कालिक संघर्षातून सामाजिक व राजकीय नेते निर्माण होत राहतील परंतु बहुजन समाजाला समानतेची पातळी गाठत आपले इप्सित साध्य करता येणार नाही.

बहुजन चळवळीची पुनर्रचना करावयाची झाल्यास अस्तित्वात असलेल्या बहुजनांचे राजकीय पक्ष व सामाजिक संघटनांना एकत्रित (merge) करून एकास एक असे नवे मॉडेल जनतेसमोर ठेवावे लागेल. व्यक्तीला महत्व न देता संघटनेसी निष्ठा ठेवत पारदार्शिक कार्यप्रणाली निर्माण केली पाहिजे. त्याग हा महत्वाचा घटक समजून नियंत्रण करणाऱ्या मातृसंघटनेची निर्मिती व्हावी. ओबीसी, अनु.जाती व जमाती या मागास जातीना राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक समानतेच्या पातळीवर आणण्याचे आश्वासन देत त्यांच्या भक्कम पाठिंब्याचे सूत्र निर्माण केले पाहिजे. एक पक्ष हि मर्यादा घालून आदर्श संघटना, पारदर्शक आचारसाहिंता व तिच्या कठोर नियमावलीची अंमलबजावणी केल्यास फुटीच्या प्रवृत्तीवर विजय मिळवीता येवू शकतो. भारतीय संविधानाला अभिप्रेत समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी हा एक कळीचा मार्ग ठरू शकतो. आजपर्यंतची जळमटे मोडीत काढून बहुजन चळवळीची पुनर्रचना होवू शकते परंतु त्यासाठी जनतेच्या व बुध्दिवंताच्या दबावाची मुख्य गरज आहे.

**लेखक:बापू राऊत**

# देवरी पं.स.कडून जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाची पायमल्ली

**गोटाबोडीच्या सरपंचाकडून शासकीय निधीचा गैरव्यवहार, गोटाबोडी ग्रामपंचायतचे उपसरपंच दीपक बावनथडे यांचा आरोप**

**देवरी :** देवरी पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या गोटाबोडी या गट ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात २०२१–२३ या कालावधीत झालेली विकासकामे ही निकृष्ठ दर्जाची आहेत. या कामासाठी आलेल्या निधीचा गैरवापर सरपंच मनोहर जनू राउत यांनी केल्याचा आरोप खुद्द उपसरपंच दीपक बावनथडे यांनी केला आहे.




सविस्तर असे की, देवरी तालुक्यातील गट ग्रा.पं. गोटाबोडी येथे सन २०२१ ते २०२३ दरम्यान झालेली विकास कामे निकृष्ठ दर्जाचे आहेत. विकास कामाकरिता आलेल्या निधीचा सरपंच मनोहर जनु राऊत यांच्याकडून गैरवापर होत असून लाखो रुपयाची अफरातफर केली सरपंचांनी केली आहे. या गैरव्यवहाराची वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांनी ताबडतोब चौकशी करावी. या प्रकरणी सरपंच व त्यांना सहकार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांवर सुद्धा कारवाई करा अशी मागणी गोटाबोडी ग्रामपंचायतचे उपसरपंच दीपक बावनथडे यांनी केले आहे.

सन २०२१ ते २०२३ दरम्यान झालेल्या विकास कामाची तक्रार उपसरपंच दीपक बावनथडे यांनी ४ महिन्यापूर्वी जिल्हाधिकारी गोंदिया, मुख्य कार्यकारी अधिकारी गोंदिया तसेच आपले सरकार तक्रार पोर्टलकडे केली आहे. दि. २० मार्च २०२४ रोजी भिसाजी जोईल (कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन) व दि.१९ मार्च २०२४ रोजी भैय्यासाहेब बेहेरे (उपजिल्हाधिकारी रोहयो गोंदिया), यांनी स्मरणपत्र दोन वेळेस जि.आर. खामतर (उपमुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद गोंदिया) यांना दिले. त्यावर अधिकाऱ्यांनी तात्काळ चौकशी व कार्यवाही केल्याचे तसा अहवाल सादर करावेत असे आदेश गटविकास अधिकारी पंचायत समिती देवरी यांना दिले. मात्र मागील तीन महिन्यापासून या प्रकरणाची कोणतीही चौकशी करण्यात आलेली नाही. ग्राम पंचायत गोटाबोडी अंतर्गत झालेल्या दर्जाहीन कामांची चौकशी टाळण्यात आली. कोणताही अहवाल सादर न करता गट विकास अधिकाऱ्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशाची पायमल्ली करीत, केराची टोपली दाखविली आहे. असा आरोप उपसरपंच दीपक बावनथडे यांनी केला आहे.

### या प्रकरणाची चौकशी सुरू आहे

**गोटाबोडी ग्रामपंचायत अंतर्गत दाखल झालेल्या तक्रारीचे व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशाचे पालन केलेले आहे. या प्रकरणाची चौकशी करण्यात आली असून येत्या दोन ते तीन दिवसात चौकशी अहवाल सादर करण्यात येईल.**

**श्री झामरे, विस्तार अधिकारी, पं.स. देवरी**

# बीपीएलकरिता मंजूर दुकाने गैर बीपीएल धारकांना वाटप




**गोंदिया:** गोंदिया पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या रजेगाव येथील ग्रामपंचायतीच्यावतीने दुकान गाड्याची निर्मिती करण्यात आली आहे. सदर दुकान गाडे बीपीएल धारकांना रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आले असले तरी गैर बीपीएल धारकांना दुकान गाडे वितरित करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आलेला आहे. त्यातच ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांना सुद्धा दुकान गाडे देण्यात आल्याचे समोर आले आहे.

ज्या दुकान गाडेधारकांना खोल्या उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. त्यांच्याकडून १५० ते २०० रुपये दरम्यान फक्त भाडे आकारले जात आहे. त्यातही नियमित भाडे वसूल केले जात आहे की नाही याबद्दल रजेगाव येथील ठाकुरप्रसाद बोरकर यांनी प्रश्चचिन्ह उपस्थित केले आहे.

बोरकर यांनी माहिती अधिकारातून मागितलेल्या माहितीनुसार २० दुकान गाड्यांपैकी दोन दुकान गाडे एचडीएफसी बँक व एक दुकान गाडे पोस्ट ऑफीसकरिता देण्यात आले आहे. तर इतर उर–लेले दुकान गाडे हे मुस्तकीन सैय्यद, प्रल्हाद ठाकरे, संपत रहांगडाले, लक्ष्मीचंद रहांगडाले, मोडकू कटरे, सुनीता रहांगडाले, भुमेश्वर बिसेन, सुरवीर डहाट, सुरजकुमार गुप्ता, तुळशीराम टेंभरे, मदनलाल पटले, फत्तूलाल बिसेन, हिवराज लिल्हारे, रेखलाल पटले, सफीशामत अली सैय्यद, ओमप्रकाश उरकुडे, इस्माइल सैय्यद यांना देण्यात आली आहे. यापैकी पोस्ट ऑफिसला देण्यात आलेल्या दुकान गाड्यातून भाडे मिळत नाही. तर एचडीएफडी बँकेकडून दोन हजाराच्यावर भाडे आकारण्यात आले आहे. मात्र इतर गाडे धारकांकडून फक्त १५० ते २०० रुपये भाडे आकारुन ग्रामपंचायतीच्या आर्थिक स्त्रोताचे नुकसान करण्यात येत असल्याचेही बोरकर यांनी म्हटले आहे. तसेच जी दुकाने वितरित करण्यात आलेली आहेत. त्यातील किती दुकान गाडेधारक हे बाहेरचे आहेत व कितींनी इतरांना भाड्याने देवून ग्रामपंचायतीची दिशाभूल केली अशावर कारवाई कधी करण्यात येणार असा प्रश्न उपस्थित केला आहे.

दरम्यान ग्रामपंचायत सचिव नागपूरे यांना यासंदर्भात विचारणा केली असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

# नागपुरात ओबीसी संघटनांची बैठक,प्रकाश शेंडगे यांनी काय इशारा दिला

**नागपूर :** लोकसभा निवडणुका संपल्यानंतर आता विधानसभा निवडणुकांची तयारी विविध संघटनांनी सुरू केली आहे. नागपूरमध्ये रविवारी ओबीसी जनमोर्चा, ओबीसी बहुजन पार्टी, राष्ट्रीय संयुक्त मोर्चा यांची बैठक आमदार निवासात झाली. माजी आमदार प्रकाश शेडगे यावेळी उपस्थित होते. विधानसभा निवडणुकीच्या संदर्भात या बैठकीत चर्चा झाल्याचे शेडगे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

या बैठकीनंतर ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी बैठकीतील मुद्द्यांचा आढावा घेतला आहे. आगामी विधानसभा निवडणुकीवरही चर्चा करण्यात आली. काही महत्वाचे निर्णय घेण्यात आले. ओबीसी बहुजन पार्टीच्या माध्यमातून आगामी विधानसभा




निवडणुकीत २८८ जागा लढवाव्या. सरकारने सगे सोयऱ्यांचा जीआर काढू नये, अन्यथा रस्त्यावर उतरु, अशी ओबीसी संघटनांची भूमिका असल्याचं प्रकाश शेंडगे म्हणाले.

नव्याने घेतलेल्या ५७ लाख नोंदी रद्द कराव्यात. शिंदे समिती बरखास्त करावी. राष्ट्रीय स्तरावर जात निहाय जनगणना करावी. केंद्राने जनगणना केली नसल्यामुळे बिहारच्या धर्तीवर राज्यात करावी. वेगळ्या विदर्भासह छोट्या राज्याची निर्मिती करावी. मराठा समाजाला दिलेला निधी त्याचा दुप्पट महाज्योति आणि मंडळाला लोकसंख्येच्या प्रमाणात द्यावं. विदर्भाचे विभागीय अध्यक्ष प्रा. रमेश पिसे यांची नियुक्ती देखील या बैठकीत करण्यात आल्याचं प्रकाश शेंडगेंनी सांगितलं.ओबीसींमध्ये संभ्रम निर्माण झाला त्यामुळे ही बैठका घेण्यात आली. जो कोणी ओबीसीच्या आरक्षणाला विरोध करेल त्याला पाडल्याशिवाय आता ओबीसी समाज स्वस्थ बसणार नाही, असंही शेंडगे म्हणाले.

# व्हीजेएनटी, ओबीसी, एसबीसीच्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती

## एएनएम,जीएनएम अभ्यासक्रमाचा समावेश,१० वर्षानंतर मिळाले यश

**गोंदिया:** एएनएम आणि जीएनएम या नर्सिंगच्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेणाऱ्या व्हीजेएनटी, एसबीसी या जात प्रवर्गातील विद्यार्थ्यांनाही आता शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. त्या अनुषंगाने महाडीबीटी प्रणालीवर मॅपिंग करण्यास राज्य शासनाकडून मान्यता देण्यात आली आहे.

इतर मागास बहुजन कल्याण विभागाने या संदर्भातील शासन निर्णय जाहीर केला असून त्यात नमूद केले आहे की, शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातून इतर मागास बहूजन कल्याण हा वेगळा विभाग निर्माण झाला आहे. सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीच्या बहुतांश योजना इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत विमुक्त जाती, भटक्या जाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता राबविण्यात येतात. परंतु, या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती मिळण्यासाठी अनज्ञेय अभ्यासक्रमांचे मॅपिंग केले नसल्याने संबंधित विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहायचे. दरम्यान, सामाजिक न्याय विभागाप्रमाणे मॅट्रिकोत्तर अभ्यासक्रमांसाठी शिष्यवृत्ती मिळण्याकरिता अभ्यासक्रम मॅपिंग व्हायला हवा, अशी मागणी सर्वच स्तरातून पुढे रेटण्यात आली. त्याची दखल घेण्यात आली आहे.

इतर मागास बहूजन कल्याण संचलकांच्या अध्यक्षतेखालील समितीने सामाजिक न्याय विभागामार्फत मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीकरिता मॅपिंग झालेले अभ्यासक्रम हे इतर मागास बहुजन कल्याण विभागातील इमाव, विजाभज, व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीच्या योजनासाठी महाडीबीटी प्रणालीवर मॅपिंग करण्याबाबत शिफारस केली आहे. त्यानुसार इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठी अभ्यासक्रमांचे मॅपिंग करण्याचा प्रस्ताव उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे सादर करण्यात आला आहे. वैद्यकीय शिक्षण विभागाकडेही शिष्यवृत्तीसंबंधी विचारणा करण्यात आली.

### पाठपुराव्याला आले यश

**दहा वर्षापासूनचा पाठपुरावा अखेर यशस्वी ठरला. ओबीसी, एनटी, एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थी एएनएम आणि जीएनएम हा नर्सिंगचा अभ्यासक्रम पूर्ण करुन स्वत:च्या पायावर उभे राहावेत. यासाठी गेल्या १० वर्षापासून संबंधित अभ्यासक्रमांना प्रवेशित नमूद प्रवर्गातील मुलांना शिष्यवृत्ती लागू व्हावी, यासाठी गेल्या १० वर्षांपासून खासगी नर्सिंग स्कूल मॅनेजमेंट असोसिएशनचा पाठपुरावा सुरु होता. त्याला आता यश आले आहे.**




### नर्सिंगच्या विद्यार्थ्यांना मिळणार थेट लाभ

**विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, परीक्षा शुल्क, शिक्षण शुल्क, निर्वाह भत्ता आदीकरिता महाडीबीटी प्रणालीवर मॅपिंग करण्यात मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे नर्सिंगच्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याचा प्रत्यक्ष लाभ मिळणार आहे.**

# क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमात जिल्हा ठरला राज्यात अव्वल

## जनजागृती, सर्वेक्षण, उपचार या त्रिसुत्रीचा अवलंब, पुणे येथे झाला गौरव

**गोंदिया:** राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राज्यातील ग्रामीण व शहरी भागात गोंदिया जिल्ह्याने क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम प्रभाविपणे राबविण्यात राज्यात अव्वल ठरला आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यांचे केन्द्र सरकारने दिलेल्या निर्देशकानुसार क्षयरोग कार्यक्रमात केलेल्या कामानुसार रॅंकिंग केले जाते. राज्यात गोंदिया जिल्ह्याने प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे.

१४ जून रोजी पुणे येथे राज्यस्तरावरील विशेष आढावा बैठकीत सहसंचालक कुष्ठरोग-क्षयरोग तथा राज्य क्षयरोग अधिकारी डॉ. दिलीप सांगळे व केंद्र शासनाचे केंद्रीय क्षयरोग कन्सलटंट डॉ. धर्मा राव यांच्या हस्ते गोंदिया जिल्ह्याचे जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. अभिजीत गोल्हार यांना सम्मानित करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर आरोग्य विभागाचे राज्य पातळीवरील अधिकारी सहायक संचालक डॉ. आडकीकर, डॉ. भालेराव, डॉ. रणदिवे, डॉ.डेकाटे, एसटीडीसी नागपूर विभागाचे संचालक डॉ. डोईफोडे व डॉ. देशपांडे उपस्थित होते.

जिल्ह्यात जिल्हा क्षयरोग अधिकारी यांच्या नेतृत्वात तब्बल १२ विविध इंडिकेटरनुसार क्षयरोग कार्यक्रम राबवून लोकांना अविरत आरोग्य सेवा देण्यात येत आहे.

यात प्रामुख्याने विविध लक्षणांनुसार संशयित क्षयरोग आजाराचे रोगी शोधणे, शोधलेल्या संशयित लोकांचे आरोग्य संस्थेत थुंकी नमुने किंवा एक्स-रे, तसेच विविध प्रयोगशाळा तपासणी मोफत करणे, क्षयरोग निघालेल्या रुग्णांना नि:शुल्क औषधोपचार सुरु करणे, औषधोपचारादरम्यान फॉलोअप ठेवणे, समुपदेशन करणे, निक्षय पोर्टलवर नोंदणी करणे, निक्षय पोषण योजनेचा लाभ देणे, रुग्णांचे दस्तावेज ऑनलाइन करणे, सहवासी लोकांची तपासणी व औषधोपचार, टीबीग्रस्त लोकांना कुठल्याही औषधींचा आरोग्यावर दुष्भप्रभाव न होऊ देणे, अशा विविध बाबींवर पर्यवेक्षण करण्यात येत असते.



**अधिकारी, फार्मासिस्ट, सामुदायिक आरोग्य अधिकारी, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, आशा सेविका यांनी लोकांना गुणात्मक सेवा दिल्याने व त्या कामांचे अहवाल करणारे डेटा एन्ट्री ऑपरेटर, तालुकास्तरीय कर्मचारी, राष्ट्रीय आरोग्य अभियान टीबी कार्यक्रमाअंतर्गत एस.टी.एस., एस.टी.एल.एस, टीबीएचव्ही, पी.पी.एम., कार्यक्रम समन्वयक, पर्यवेक्षक यांनी उत्तमप्रकारे सादरीकरण केल्याने जिल्ह्याची रॅंकिंग प्रथम क्रमांकावर आली आहे.**

**डॉ. अभिजित गोल्हार, जिल्हा क्षयरोग अधिकारी.**

### यासाठी मिळाला पुरस्कार

**क्षयरोग आरोग्य कार्यक्रम व उपक्रमांची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी झाल्याने राज्यात प्रथम येण्याचा बहुमान गोंदिया जिल्ह्याने पटकावला आहे. डॉ. अभिजीत गोल्हार यांच्या नेतृत्वात जिल्हा क्षयरोग विभागाने उत्कृष्ट सांघिक कार्य व गावपातळीवर केलेल्या सुक्ष्म नियोजनाच्या जोरावर राज्यात प्रथम येण्याचा बहुमान गोंदिया जिल्ह्याने पटकावला आहे.**

# मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत कामे तातडीने पूर्ण करा-आ.विजय रहांगडाले



**तिरोडा:-** तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राअंतर्गत विधानसभा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रस्ता बांधकामे सुरु असून सदर काही बांधकामामध्ये दिरंगाई होत असल्यामुळे तिरोडा गोरेगाव विधासभा क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक आयोजित केली. त्यामध्ये प्रामुख्याने चूरडी चिखली रस्ता बांधकामामध्ये महावितरण विभागाचे विद्युत तार अडथडा निर्माण करीत असल्याने विद्युत तारांची उंची वाढविण्यात यावी,त्याकरिता कार्यकारी अभियंता सा.बा.विभाग व महावितरण कार्यकारी अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळी पाहणी करण्याचे आदेश देण्यात आले.

मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत कवलेवाडा बोरगाव खाडीपार व गणखैरा पूरगाव सिलेगाव या रस्ता बांधकामाबाबत आमदार महोदयांनी नाराजी व्यक्त केली असून सदर बांधकाम पावसाळ्यापूर्वी पूर्ण होणे अपेक्षित होते परंतु कंत्राटदार व संबधित विभागातफर्फे सदर बांधकामावर हलगर्जीपणा दाखविण्यात असल्याबाबत जिल्हाधिकारी महोदयांच्या निदर्शनास आणून दिले त्यावर तातडीने गुणवत्तापूर्वक वेळेच्या आधी काम पूर्ण करण्याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी महोदयांनी संबधित विभागास दिले.

पंतप्रधान किसान सन्मान निधीमध्ये सन २०१९ नंतर फ्फ़ `रफ्फ़ार झालेल्या शेतक-यांना किंवा खरेदी केलेल्या शेतक-यांचे रजिस्ट्रेशन होत नसल्याने शेतकरी लाभापासून वंचित राहत आहेत हि बाब तातडीने मार्गी लावण्याबाबतच्या सूचना आमदार महोदयांनी दिल्या, तिरोडा नगरपरिषद अंतर्गत महात्मा फुले वार्डातील मागील ४० ते ५० वर्षापासून अतिक्रमणधारकांना पट्टे वाटप करून पंतप्रधान आवास योजनेचा लाभ देणे या विषयावर चर्चा करण्यात आली, या बैठकीमध्ये प्रामुख्याने जिल्हाधिकारी प्रजीत नायर, सा.बा.विभाग कार्यकारी अभियंता श्री लभाने, मुग्रासयो कार्यकारी अभियंता श्री आव्हाडे, महावितरण कार्यकारी अभियंता श्री जैन,उपभियंता अनिल रहांगडाले, देशमुख उपस्थित होते.

# पटोले, कुथे यांची भेट राजकीय की कौटुंबिक

## विधानसभेपुर्वी घडामोडींना वेग, माजी आमदाराच्या प्रवेशाचे केले सुतोवाच

**गोंदिया:** लोकसभा निवडणुकीत भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्रात कॉंग्रेसला मिळालेल्या यशानंतर कॉंग्रेसच्या गोटात उत्साह संचारला असून जिल्ह्यातील काही दिग्गज नेते आणि पदाधिकारी कॉंग्रेसच्या वाटेवर असल्याची चर्चा रंगली आहे. अशातच कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे शुक्रवारी (दि.१४) गोंदिया येथे एका कार्यक्रमासाठी आले असता त्यांनी भाजपाचे माजी आमदार रमेश कुथे यांच्या निवासस्थानी भेट दिली. ही भेट कौटुंबिक असल्याची सांगितली जात असली तरी, या भेटीत राजकीय खिची शिजल्याची माहिती आहे. त्यामुळे पटोले, कुथे यांची भेट राजकीय की कौटुंबिक अशी चर्चा जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात रंगली आहे.

माजी आमदार रमेश कुथे हे शिवसेनेकडून गोंदिया विधानसभेवर निवडून आले होते; पण गेल्या निवडणुकीत त्यांनी भाजपामध्ये प्रवेश केला. पण अद्यापही ते भाजपमध्ये फारसे रुळले नसल्याचे चित्र आहे. त्यातच त्यंचे प्रतिस्पर्धी समजले जाणारे माजी आ. गोपालदास अग्रवाल यांनीही गेल्या निवडणुकीत भाजपामध्ये प्रवेश केला. त्यामुळे तेव्हापासूनच एका म्यानात दोन तलवारी राहणार का, अशी चर्चा होती. पण गेल्या पाच वर्षात दोघांनीही एकमेकांना सांभाळून घेतल्याचे चित्र आहे. लोकसभा निवडणुकीनंतर चार महिन्यांनी विधानसभा निवडणुका होऊ घातल्या आहेत. यासाठी गोंदिया विधानसभा मतदारसंघात मोर्चेबंधणीला सुरुवात केली आहे. त्यातच जि.प. कृषी सभापती सोनू कुथे हे ही विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक आहेत. गोंदिया विधानसभ क्षेत्रातून कॉंग्रेस या वेळेस दमदार उमेदवार देण्याच्या तयारीत आहे. यासाठी काही नाव चर्चेत आहे. दरम्यान कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी शुक्रवारी माजी आ. रमेश कुथे यांच्या निवासस्थानी भेट दिली. या दोघांमध्येही जवळपास तासभर चर्चा झाल्याची माहिती आहे. कुथे व पटोले ही राजकीय नव्हे, तर कौटुंबिक भेट असल्याचे सांगत असले तरी या भेटीत राजकीय खिचडी शिजल्याचे बोलल्या जाते.



### गोंदिया विधानसभेत कॉंग्रेसकडून चेहऱ्याचा शोध

**जिल्ह्यातील दोन माजी आमदार कॉंग्रेसेच्या वाटेवर असल्याची चर्चा गेल्या अनेक दिवसांपासून आहे. पण यावर कॉंग्रेसच्या नेत्यांनी आतापर्यंत कुठलीच प्रतिक्रिया दिली नव्हती, पण शुक्रवारी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी लवकरच जिल्ह्यातील एक माजी आमदार पक्षात दाखल होणार असल्याचे सुतोवाच केले. त्यामुळे ते माजी आमदार कोण, याची चर्चा रंगली असून, अनेकांनी अंदाज बांधणे सुरु केले आहे. तर गोंदिया विधानसभा क्षेत्रातून कॉंग्रेस नवीन चेहऱ्यांचा शोध घेत असल्याची माहिती आहे.**

### पटोलेंनी सुरु केल्या गाठीभेटी

**लोकसभा निवडणुकीत कॉंग्रेसला मिळालेल्या यशानंतर प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आता गोंदिया-भंडारा जिल्ह्यातील कॉंग्रेसच्या जुन्या, निष्ठावान कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीपुर्वी पटोले हे गड अधिक मजबूत करण्याच्या मागे लागल्याचे चित्र आहे,**

### त्या पदाधिकाऱ्यांचा प्रवेश केव्हा

**लोकसभा निवडणुकीदरम्यान भाजप आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसमधील काही पदाधिकारी कॉंग्रेसमध्ये प्रवेश करणार असल्याची चर्चा रंगली होती. यावर त्या नाराज पदाधिकाऱ्यांनीही दुजोरा दिला होता. आता विधानसभा निवडणुकीपुर्वी त्यांचा कॉंग्रेस प्रवेश होणार का, अशी चर्चा जिल्ह्यातील राजकीय वर्तूळात रंगली आहे.**

# विजय रहांगडालेची हॅटट्रिक की नव्या चेहऱ्याची एन्ट्री

## भाजपाचा राहिला आहे गड, अपक्षांनी बिघडविले दोन निवडणुकीत समीकरण नव्या समीकरणामुळे पुन्हा खिचडी



**गोंदिया:** तिरोडा विधानसभा मतदारसंघ हा भाजपाचा गड म्हणून ओळखला जातो. गेल्या तीन निवडणुकांपासून या मतदारसंघावर भाजपाचे वर्चस्व राहिले आहे. सन २०१४ पासून या मतदारसंघाचे नेतृत्व आ.विजय रहांगडाले हे करीत आहेत. तर येत्या विधानसभा निवडणुकीत ते याची चर्चा आहे. लोकसभा निवडणुकीत या मतदारसंघातून भाजपा उमेदवार सुनील मेंढे यांना ९ हजार मतांचे मताधिक्य मिळवून देण्यात विद्यमान आ. विजय रहांगडाले यांना यश आले. पण गेल्या निवडणुकीच्या तुलनेत मताधिक्य घटले आहे. त्यामुळे ही सुद्धा चिंता वाढविणारी बाब आहे.





पुन्हा निवडणूक रिंगणात राहणार असल्याने या मतदारसंघातून ते निवडून येण्याची हॅटट्रिक मारत इतिहास रचतात की या मतदारसंघातील मतदार नव्या चेहऱ्याला संधी देतात याची उत्सुकता राहणार आहे.

लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर या निकालाचे विधानसभा निवडणुकीवर काय परिणाम होईल, चित्र कसे राहणार या मतदारंघातील प्रमुख पक्षाच्या उमेदवारांच्या विजयाचे समीकरण बिघडविण्यात अपक्ष उमेदवाराची भूमिका गेल्या दोन निवडणुकीत महत्वपूर्ण राहिली आहे. त्यामुज़े येत्या निवडणुकीत नेमके काय चित्र राहते हे महत्वपूर्ण राहणार आहे. तर राज्यातील महाविकास आघाडी आणि महायुतीच्या समीकरणामुळे उमेदवारीवरुन मतदारसंघात तिढा निर्माण होण्याची शक्यता आहे.

या मतदारसंघावर भाजपाचे वर्चस्व असल्याने महायुतीत त्यांचा दावा प्रबळ राहणार आहे. पण गेल्या दोन तीन-निवडणुकांपासून राष्ट्रवादी कॉंग्रेस सुद्धा नशीब आजमावित आहे. तर आाता राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये दोन गट पडले असून दोन्ही गटाकडून उमेदवारीचा दावा कायम आहे. त्यामुळे महायुतीत उमेदवारीसाठी एक पाऊल कोण मागे घेतो हे महत्वपूर्ण ठरणार आहे. तर हीच स्थिती महाविकास आघाडीत आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गट आणि कॉंग्रेसकडून सुद्धा मतदारसंघावर दावा सांगितला जात आहे. उमेदवारीवरुन पेंच कायम राहण्याची शक्यता आहे.



### विधानसभेसाठी या नावांची चर्चा

**भाजपाचे विद्यमान आ. विजय रहांगडाले, जि.प. अध्यक्ष पंकज रहांगडाले, माजी जि.प.उपाध्यक्ष मदन पटले तर कॉंग्रेसकडून माजी आ. दिलीप बन्सोड,पी.जी.कटरे राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाकडून प्रेमलाल रहांगडाले, राजलक्ष्मी तुरकर,जि.प.सदस्य जगदिश बावनथडे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटााकडून गुड्डू बोपचे यांच्या नावाची चर्चा आहे. तर सर्वच पक्षांकडून ऐनवेळी धक्कादायक नाव समोर येण्याची शक्यता नाकारता येत आहे.**

### थेट लढतीची शक्यता

**सन २०१४ आणि सन २०१९ च्या निवडणुकीत अपक्ष उमेदवार दिलीप बन्सोड यांनी तिसऱ्या क्रमांकाची मते घेत दुसऱ्या क्रमांकावरील उमेदवाराच्या विजयाचे समीकरण बिघडविले होते; पण ते आता कॉंग्रेस पक्षात असून त्यांची या मतदारसंघाऐवजी अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघातून लढण्याची इच्छा आहे. त्यामुळे भाजपा आणि दुसरा उमेदवार यांच्यात थेट लढत होण्याची शक्यता आहे.**

### असे होते गेल्या दोन निवडणुकीतील चित्र

| विधानसभा २०१४ | विधानसभा २०१९ |
|---|---|
| विजय रहांगडाले | विजय रहांगडाले |
| भाजपा-५४१६० (विजयी) | भाजपा-७६४८२ (विजयी) |
| दिलीप बन्सोड-अपक्ष-४१०६२ | रविकांत बोपचे |
| राजलक्ष्मी तुरकर- | राष्ट्रवादी कॉंग्रेस-५०५१९ |
| राष्ट्रवादी कॉंग्रेस-३११४७ | दिलीप बन्सोड (अपक्ष)-३३१८३ |

# नुकसान ग्रस्त भागाचे पंचनामे तात्काळ करा : जि.प.अध्यक्ष पंकज रहांगडाले

**गोंदिया :** गोंदिया जिल्ह्यातील, तालुका गोंदिया येथील ग्राम चुटिया येथे चक्रीवादळामुळे व पावसामुळे घरांचे मोठे नुकसान झाल्याची बातमी जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांना प्राप्त झाली होती. क्षेत्रातील अनेक नागरिकांनी झालेल्या नुकसानी बाबत त्यांना कळविले होते. नुकसानीचा आढावा घेण्यासाठी जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी चक्रीवादळाने नुकसान झालेल्या ग्राम चुटीया येथे जाऊन नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली तसेच नुकसानग्रस्त कुटुंबाची भेट घेतली.



दरम्यान अनेक घरांची पडझड झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा आणि नुकसानग्रस्त कुटुंबांना नुकसानी भरपाई मिळावी अशा सूचना त्यांनी अधिकारी वर्गाला दिलेल्या आहेत. नुकसानभरपाई लवकरात लवकर मिळावी यासाठी शासनदरबारी पाठपुरावा करणार असल्याचे आश्वासन नुकसानग्रस्त कुटुंबांना पंकज रहांगडाले यांनी दिले.

यावेळी क्षेत्राचे जिल्हा परिषद सदस्य आणि सभापती योपेंद्रसिंह (संजू) टेंभरे, अजित टेंभरे, दुर्गाप्रसाद ठाकरे, दिलीप बोपचे, गणराज पटले, व ग्रामस्थ उपस्थित होते.

## सडक अर्जुनी येथे प्रकल्प आढावा बैठक उत्साहात

**सडक अर्जुनी:** -श्री गुरुदेव सेवा मंडळ शाखा पळसगाव/सोनका,ता.साकोली जि. भंडाराच्या वतीने ९ जून रोजी जिल्हा परिषद हायस्कूल सडक अर्जुनी येथे श्री गुरुदेव सुसंस्कार गुरुकुल प्रकल्पाची नव्याने उभारणी करण्याकरिताआढावा बैठक घेण्यात आली.सदर आढावा बैठकीमध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थी हा ग्रामगीतेच्या तत्त्वप्रणालीवरून आदर्श विद्यार्थी बनावे, सुसंस्कारीत विद्यार्थी बनवा आणि आदर्श माणूस बनावा या संकल्पना आणि उद्दिष्ट पुढे ठेवून श्री गुरुदेव सुसंस्कार गुरुकुल प्रकल्प गोंदिया जिल्ह्यात सुरू करण्याचा प्रयत्न आहे.

या गुरुकुलाच्या माध्यमातून गावे जागृत होतील, गावांमधील एकनिष्ठता, अखंडता वाढेल, गाव आदर्श वाटचालीकडे जातील, आणि गावावरून आपल्या देशाचे भवितव्य उज्वल होईल.आदी सर्व गोष्टींचे अवलोकन करून ही आढावा बैठक उत्साहात पार पडली,बैठकीला मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते.

# कोदामेडी ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी राऊत



**सडक अर्जुनी:** तालुक्यातील कोदामेडी, केसलवाडा गट ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी निशांत राऊत यांची सोमवारी (दि.१०) एकमताने निवड करण्यात आली. कोदामेडी केसलवाडा येथील उपसरपंचावर यावर्षी एप्रिल महिन्यात अविश्वास ठराव पारित करण्यात आला होता. त्यामुळे येथील उपसरपंच पद रिक्त झाले होते. रिक्त झालेल्या पदासाठी सोमवारी निवडणूक घेण्यात आली. एकूण नऊ सदस्य असलेल्या ग्रामपंचायत उपसरपंचपदी बिनविरोध निशांत राऊत यांची निवड करण्यात आली. यावेळी उपसरपंचपदासाठी एकच अर्ज दाखल करण्यात आला होता. त्यामुळे बिनविरोध निवड करण्यात आली. निवडणुकीची प्रक्रिया तहसील कार्यालयाचे मंडळ अधिकारी वरकडे यांनी पार पाडली.

यावेळी सरपंच विनोद पुराम, ग्रामपंचायत सदस्य रामदास भीवगडे, सुलोचना मुनीश्वर, रोशनी शेलारे, कामिनी चांदेवार, कुसूम तरोणे, अजूम खान आदी उपस्थित होते.

# दुर्लक्षित अशा गुराख्यांचा सावरटोल्यात सन्मान;गावकऱ्यांनी जोपासली १० वर्षापासून परंपरा

**गोंदिया:** गाव खेड्यातील अत्यंत दुर्लक्षित असा समुदाय म्हणजे गुराख्यांचा.वर्षभर गावातील गोपालकांच्या गाई-ढुरे राखायला म्हणजे चराईसाठी गावा सभोवतालच्या जंगलात चारा चारायला नेतात.दिवसभर चारून गावात सायंकाळी इमाने-इतबारे गोपालकांच्या घरी पोहचवून देतात. अशा समाजातील दुर्लक्षित गुराख्यांचा सन्मान अर्जुनी मोरगाव तालुक्यातील सावरटोला येथे सामाजिक कार्यकर्ते तथा गोंदिया जिल्हा मराठा सेवा संघाचे अध्यक्ष इंजि.सुनील तरोणे यांच्या पुढाकाराने दुधारा कार्यक्रमांतर्गत भेटवस्तू देऊन दि.९ जून रोजी करण्यात आला.

सर्व गावकऱ्यांच्या वतीने सुनील तरोणे व यांनी त्यांच्याप्रती व्यक्त केलेली कृतज्ञता पाहून गावातील १७ गुराखी भारावून गेले, गदगद झाले. समाजरूढी प्रमाणे एरव्ही गावात या गुराख्यांना पाहिजे तसा मान सन्मानाच्या दृष्टीने पाहिले जात नाही. हे येथे उल्लेखनीय आहे.

आधुनिक तंत्रज्ञान व विज्ञान युगात अतिशय दुर्लक्षित असलेल्या गुराखी (बल्की) यांचा मानसन्मान करण्याची परंपरा सावरटोला येथील सुनील तरोणे यांच्या पुढाकाराने गेल्या १० वर्षापासून गुराख्यांचा भेटवस्तू देऊन सन्मान करून त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा एक आगळावेगळा स्तुत्य व अनुकरणीय उपक्रम गावात सुरू केला आहे. गावातील गायरान क्षेत्रावर सर्व पाळीव जनावरे चारण्याचे कार्य वर्षभर उन्हाळा, पावसाळा किंवा हिवाळा असो गुराखी प्रामाणिकपणे करीत असतात. त्या बदल्यात वर्षाला त्यांना धान्य कपडेलत्ते, आता पैशाच्या रूपात मोबदला दिला जातो. पारंपारिक गोवारी समाज गाईढुरे चारायला नेण्याचे काम परंपरेने करीत असतात. आता गावाची गरज लक्षात घेऊन इतर समाजाचे लोकही गुराख्याचे काम करतात.



वर्षाचे ३६५ दिवसात कधी सुट्टी न घेणारे हे गुराखी समाजापासून व शासनाच्या विविध योजनांपासून खूप लांब यांना त्याची जाणीव नसलेले, अतिशय दुर्लक्षित असलेले हे गुराखी यांचा वृद्धपकाळ अतिशय हलाखिचा जातो.काम नाही तर दाम नाही या न्यायाने, गावकरी त्यांच्याकडे दुर्लक्ष करतो मग घरचे मुलं-बाळ, नातवंड, सुना कमावत नाही तर काही कामाचा नाही. अशा नजरेने त्यांच्याकडे पाहतो. घरातच मग त्याची उपेक्षा व्हायला लागते. समाजातील इतर दुर्बल घटकाप्रमाणे शासनाने वृद्धत्व पेन्शन योजनेसाठी प्राधान्याने गुराख्यांचा विचार व्हायला पाहिजे. मागील दहा वर्षापासून त्यांच्याकरिता मृग नक्षत्राच्या मुहूर्तावर दुधारा या कार्यक्रमाचे आयोजन सावरटोल्यात केले जाते.

दुधारा म्हणजे वरूण देव व निसर्गाला साकडे घालणे होय.वर्षभर आम्ही गावातील गाईढुरे राखण्यासाठी जंगलात जातो,वरुण राजा व निसर्गाने आपल्या गाई गुरांवर व आपल्यावर कृपा ठेवावी, कुठल्याही प्रकारचे अरिष्ट, निसर्गाची अवकृपा होऊ नये, वीज, वादळ व इतर नैसर्गिक संकटे गाई- गुरांवर व आपल्यावर येऊ नये.अशा बिकटप्रसंगी प्रसंगी आपले संरक्षण करावे, यासाठी वरूनराजा व निसर्गाला केलेली विनवणी आहे. दुधारा हा विधी दरवर्षी मृग नक्षत्रात गुराखी-गोवारी करीत असतात.

आनंदी वातावरणात संपन्न झालेल्या या दुधारा कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संजीव बडोले हे होते.तर पाहुणे म्हणून विजय डोये, रामदास बोरकर, चिंतामण तरोणे, भास्कर शिवणकर, यादव तरोणे, मोहन शिवणकर, भेंडारकर प्राम ुख्याने उपस्थित होते. अतिथींच्या हस्ते गावातील १७ गुराख्यांचा भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी उपस्थित पाहुण्यांनी गुराख्यांच्या दुःख,वेदना त्यांचे कार्य व समाजातील होणारी त्यांची उपेक्षा यावर आपल्या भाषणातून प्रकाश टाकला. यावेळी गुराखी संघाच्या वतीने ज्येष्ठ गुराखी वारलू सोनवाणे,गोपाल ब्राह्मणकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यामध्ये सावरटोला येथील जवळपास १७ गुराखी यांना एकत्र आणून,त्यांचे टिळा लावून औक्षण करण्यात आले. त्यांचा मानसन्मान केला त्यांना नवीन कपडे भेट देण्यात आले. सामूहिकरीत्या दुधारा कार्यक्रमात जेवणाची मेजवानी दिली. या भावपूर्ण सन्मानाने सर्व गुराखी भारावून गेले. सामूहिक जेवणानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडून , संचालन व उपस्थितांचे आभार सुनील तरोणे यांनी मानले.

### यांचा झाला सन्मान

**वारलू सोनवाणे, पुरुषोत्तम चचाने, रायभान चचाने, पिसाराम तरोणे, रामकृष्ण तरोणे, गोपाल ब्राह्मणकर, रामदास मेश्राम, दयाराम मेश्राम, शालिक बिहारे, भोजराम तरोणे,श्रीकृष्ण पाऊलझगडे, विश्वनाथ मेश्राम, नारायण डोये, मार्कंड मेश्राम, पतिराम तरोणे, दिगांबर सोनवणे यांचा या दुधारा कार्यक्रमात औक्षण करून,भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला.**

**गुराखी हे अतिशय दुर्लक्षित असून, त्यांना समाजातील इतर गोष्टीशी काही देणं घेणं नसते.गावातील पाळीव जनावरे चारायचे आणि सायंकाळी आणून बांधले की, आपले काम संपले. सकाळी उठून पुन्हा तेच कार्य, असं दैनंदिन कार्यक्रम असलेल्या या गुराख्यांकरिता त्यांची कामगिरी जिवंत राहावी, समाजात आपली उपेक्षा होते. हे शल्य त्यांच्या मनात राहू नये व आनंदाचे दोन क्षण त्यांना अनुभवता यावे. त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या दुधारा कार्यक्रमाचे आम्ही गावकरी दरवर्षी आयोजन करीत असतो.**

**-सुनील तरोणे, सामाजिक कार्यकर्ते, सावरटोला.**


## ग्रामपंचायत कार्यालय हिरडामाली
## पंचायत समिती गोरेगाव
## ई-निविदा

निविदा क्रं.१ दिनांक:-१२/०६/२०२४

ग्रामपंचायत कार्यालय हिरडामाली येथील सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता बांधकाम साहीत्य, हातपंप साहित्य, दिवाबत्ती साहित्याची ई-निविदा तसेच ब्लिचींग खरेदी व इतर साहित्य करीता लिफाफा बंद ऑफ लाईन निविदा दि.२१/०६/२०२४ ते २८/०६/२०२४ स्विकारण्यात येणार आहे.

**ई-निविदा तपशील**

| | | |
|---|---|---|
| १ | ई-निविदा प्रसिद्धी व दाखल दिनांक | दिनांक २१/०६/२०२४ |
| २ | ई-निविदा अंतिम दिनांक | दिनांक २८/०६/२०२४ सायंकाळी ५. वा.पर्यंत |
| ३ | ई-निविदा उघडण्याची दिनांक | दिनांक २९/०६/२०२४ ला ५.०० वा. शक्य झाल्यास |

**सरपंच**
**ग्रा.पं.हिरडामाली**

**ग्रामसेवक**
**ग्रा.पं.हिरडामाली**

# नवेगावबांध येथील जलाशयात मान्सूनपूर्व तयारीची रंगीत तालीम

**गोंदिया :** मान्सूनपूर्व तयारी २०२४ च्या अनुषंगाने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गोंदियातर्फे पूर परिस्थितीत शोध व बचावकार्य संबंधाने अर्जुनी मोरगाव तालुक्यातील नवेगावबांध येथील जलाशयात १४ जून २०२४ रोजी शोध व बचाव पथकाद्वारे पूर परिस्थितीत सुरक्षा व बचाव तसेच पूर परिस्थितीत उपयोगी पडणारे शोध बचाव साहित्यांची तपासणी करून रंगीत तालीम घेण्यात आली.



मागील वर्षी २०२३ मध्ये राज्यात आलेली पूर परिस्थिती लक्षात घेऊन यावर्षी जिल्हा प्रशासनाकडून जिल्हाधिकारी प्रजित नायर यांच्या मार्गदर्शनात प्रत्येक तालुक्यात नागरिकांसाठी शोध व बचाव प्रशिक्षण कार्यक्रम व पूर परिस्थितीमध्ये सुरक्षा व बचाव या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहे. पूर परिस्थितीमध्ये जीवित व वित्तीय हानीचे प्रभाव कमी करण्यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गोंदियातर्फे सदर कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. त्यानुषंगाने नागरिकांना पूर परिस्थितीमध्ये तात्काळ मदत पुरविण्यासाठी जिल्हा शोध व बचाव पथकातर्फे अर्जुनी मोरगाव तालुक्यातील नवेगावबांध येथे रंगीत तालीम व प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

मान्सूनपूर्व तयारी २०२४ च्या अनुषंगाने गावपातळीवर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात आली आहे. तसेच हवामान खाते व पूर परिस्थिती संदर्भात नागरिकांना व्हाट्सॲप ग्रुपच्या माध्यमातून माहिती देण्याकरिता तालुका व गाव पातळीवर व्हाट्सॲप ग्रुप तयार करण्यात येत आहे.

सदर रंगीत तालीम व प्रशिक्षण कार्यक्रमात अनिरुद्ध कांबळे तहसीलदार अर्जुनी मोरगाव, विजय हटवार उपकार्यकारी अभियंता जि.प.गोंदिया, राहुल टेंभुर्णे उपअभियंता, जितेंद्र सोरले, संजय शहारे, लुकेश पटले, शैलेश डोंगरे शाखा अभियंता जि.प.गोंदिया, दीपक परिहार अ.का. व शोध बचाव पथकाचे सदस्य नरेश उईके, रविंद्र भांडारकर, संदीप कराडे, दिनू दिप, सुरेश पटले, दुर्गप्रसाद गगंगापारी, चालक मुकेश अटरे, होमगार्ड ट्रेनर इंद्रकुमार बिसेन, चुनीलाल मुटकुरे, पवन जगणे, गिरधारी पतैह, जबराम चिखलौंडे, चिंतामन गिरीपुंजे, मंडळ अधिकारी, तलाठी, कोतवाल, कर्मचारी व नागरिक प्रामुख्याने उपस्थित होते.

### नैसर्गिक आपत्तीचे संदेश आता डचड द्वारे

**जिल्ह्यातील पूर प्रवण ९६ गावामधील नागरिकांसह जिल्ह्यातील सर्व नागरिकांना नैसर्गिक आपत्ती विषयक सूचना, संदेश, इशारा व माहिती प्राप्त करून घेण्यासाठी आपले चालू मोबाईल क्रमांक मधून खालील मोबाईल नंबर व लँडलाईन क्रमांकावर डायल करून आपले मोबाईल क्रमांक पंजीकृत करावे. ९४०४९९१५९९ किंवा ०७१८२-२३०१९६ वरील क्रमांकावर पंजीकृत मोबाईल धारकांना जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गोंदिया यांचेमार्फत विविध प्रकारच्या आपत्ती विषयक सूचना, संदेश, इशारा व माहिती चे डचड पाठविण्यात येणार आहेत. तरी सर्व नागरिकांनी आपले मोबाईल पंजीकृत करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी जिल्ह्यातील सर्व नागरिकांना केले आहे.**

# नक्षलवाद्यांना सात गावांत प्रवेशबंदी; दहशत झुगारून गावकऱ्यांनी घेतला ऐतिहासिक निर्णय



**गडचिरोली :** गेल्या ४० वर्षांपासून नक्षलवाद्यांच्या दहशतीत जीवन जगणाऱ्या गडचिरोली जिल्ह्यातील ७ दुर्गम गावांनी नक्षलवाद्यांना गावात येण्यास बंदी घातली आहे. अतिदुर्गम भामरागड तालुक्यातील या गावातील नागरिकांनी एकत्रितपणे येऊन सर्वानुमते नक्षलवाद्यांना गावबंदी करण्याचा निर्णय घेतला. तसा ठराव धोडराज पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांच्याकडे सादर केला.

ही सातही गावे गडचिरोली जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर अबुझमाड परिसराला लागून आहेत. या गावांमध्ये नक्षलवाद्यांचे वर्चस्व होते, तसेच गावातील काही सदस्यांचा नक्षलवाद्यांना पाठिंबा होता. त्यामुळे जिल्हा प्रशासन व पोलीस प्रशासनास त्यांच्यापर्यंत पोहोचण्यास अडचणी येत होत्या. मागील तीन वर्षांमध्ये गडचिरोली पोलीस दल, पोलीस दादालोरा खिडकीच्या माध्यमातून "प्रोजेक्ट उडान'अंतर्गत जनजागरण मेळावे, दिव्यांग मेळावे, कृषी सहली, कृषी मेळावे, आरोग्य मेळावे, महिला मेळावे आयोजित केले. येथील गावकऱ्यांपर्यंत शासनाच्या विविध योजना पोहोचविण्यात यशस्वी झाल्याने पोलीस दलाप्रती गावकऱ्यांचा विश्वास दृढ झाला. अलीकडील काळात या परिसरात इरपनार येथे "मोबाइल टॉवर'ची उभारणी करण्यात आली. सात गावांनी घेतलेल्या ऐतिहासिक निर्णयासाठी उपअधीक्षक अमर मोहिते, धोडराजचे प्रभारी अधिकारी शरद काकळीज यांनी पुढाकार घेतला.

### गावकऱ्यांच्या ठरावातील अटी

**कोणत्याही नक्षलवाद्यास जेवन, रेशन, पाणी गावकऱ्यांमार्फत दिले जाणार नाही. त्यांना कसल्याही प्रकारची मदत करण्यात येणार नाही. गावातील नागरिक स्वत: किंवा त्यांच्या मुलाबाळांना नक्षलवादी संघटनेत सहभागी करून घेणार नाही. त्यांचे कोणत्याही प्रकारचे काम करणार नाही किंवा त्यांचे प्रशिक्षण करणार नाही. नक्षलवाद्यांच्या बैठकीला जाणार नाही. त्यांच्या खोट्या प्रचारास बळी पडणार नाही, असे ठरावात म्हटले आहे. धोडराज हद्दीतील गावांनी नक्षल गावबंदी केल्यामुळे मिडदापल्ली गावातील नागरिकांनी जंगल परिसरात पोलीस पथकासाठी केलेले खड्डे बुजवून त्यातील लोखंडी सळया (सलाखे) काढून पोलिसांना दिले. इतर गावातील नागरिकांना देखील पोलिसांना सहकार्य करण्याची भूमिका घेतली आहे.**

**नक्षलवाद्यांकडून पोलीस खबऱ्या असल्याच्या संशयावरून निष्पाप गावकऱ्यांच्या हत्या व मारहाण केली जात होती. नुकसानीच्या विविध घटना, गावांच्या विकास कामात करण्यात येणारा अडथळा, जनतेला दाखविण्यात येणारा धाक आदी घटनांमुळे नक्षलवादी जनतेची दिशाभूल करत आहेत हे गावकऱ्यांच्या लक्षात आले. त्याचाच परिपाक म्हणून हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. इतर गावांनीही निर्भयपणे विकासाची वाट निवडावी.**

**नीलोत्पल, पोलीस अधीक्षक, गडचिरोली.**

# ओबीसी विद्यार्थ्यांकरीता ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना लागू

**द्वितीय,तृतीय व अंतीम वर्षातील विद्यार्थ्यांकडून १५ जुलै पर्यंत अर्ज आमंत्रित**




**गोंदिया :** ओबीसी व्हीजेएनटी समाजातील इयत्ता १२ वी नंतरच्या व्यावसायीक तसेच बिगर व्यावसायीक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या परंतु इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या, आदिवासी विकास विभागाच्या, सामाजिक न्याय विभागाच्या किंवा संबंधीत शैक्षणिक संस्थेच्या वसतीगृहामध्ये मोफत प्रवेश मिळालेला नसलेल्या इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भोजन भत्ता, निवास भत्ता व निर्वाह भत्ता या विद्यार्थ्यांना स्वत: उपलब्ध करुन घेण्यासाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना सन २०२४-२५ या सत्रापासुन कार्यान्वित सुरु केलेली आहे.

त्या योजनेतंर्गत ६०० विद्यार्थ्यांना जिल्हास्तरावर संधी मिळणार असून आवश्यक रक्कम संबंधीत विद्यार्थ्यांचे आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट वितरीत करण्यात येणार आहे. या ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेचे अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख १५ जुलै २०२४ आहे.

सदर योजनेच्या अटी व शर्ती पुढील प्रमाणे आहेत. विद्यार्थी वसतीगृह प्रवेशास पात्र असावा. विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा. सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जातीचा दाखला (इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग). विद्यार्थी अनाथ असल्यास महिला व बाल कल्याण विभागाकडील सक्षम प्राधिकाऱ्याचे अनाथ प्रमाणपत्र. विद्यार्थी दिव्यांग असल्यास जिल्हा शल्यचिकित्सक यांचे ४० टक्के पेक्षा जास्त दिव्यांग असल्याबाबतचे प्रमाणपत्र. विद्यार्थ्यांचे पालकांचे वार्षिक उत्पन्न २ लाख ५० हजार पेक्षा जास्त नसावे. विद्यार्थ्याने स्वत: चा आधार क्रमांक आपले राष्ट्रियकृत बँक खात्याशी संलग्न करणे बंधनकारक राहील. विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेली शैक्षणिक संस्था ज्या शहराच्या/तालुक्याच्या ठिकाणी आहे अशा शहरातील सदर विद्यार्थी रहिवाशी नसावा. विद्यार्थी इयत्ता १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेत असावा. विद्यार्थ्यांना सदर योजनेसाठी अर्ज करतांना किमान ६० टक्के गुण व दिव्यांगास ५० टक्के गुण असणे आवश्यक आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांचे कमाल वय ३० वर्षापेक्षा अधिक नसावे. विद्यार्थी कोणत्याही प्रकारची नोकरी किंवा व्यवसाय करीत नसावा. भाड्याने राहत असल्याबाबत व स्थानिक रहिवाशी नसल्याचे प्रतिज्ञापत्र (नोटरी). स्वयंघोषणापत्र (दिलेली माहिती खरी व अचुक असल्याबाबत). कोणत्याही शासकीय वसतीगृहात प्रवेश घेतला नसल्याबाबतचे शपथपत्र. भाड्याने राहात असल्याबाबतचे भाडे चिठ्ठी व भाडे करारपत्र/करारनामा. महाविद्यालयात प्रवेश घेतल्याबाबतचा पुरावा. विद्यार्थ्यांची महाविद्यालयातील उपस्थिती किमान ७५ टक्के असणे आवश्यक राहील.

वरील अटी व शर्तीनुसार सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमात द्वितीय, तृतीय व अंतीम वर्षात शिकत असलेल्या पात्र विद्यार्थी/विद्यार्थिंनींनी सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मागे, पतंगा मैदान, गोंदिया येथे आवश्यक कागदपत्रासह १५ जुलै २०२४ पर्यंत अर्ज सादर करावे. असे आवाहन विनोद मोहतुरे, सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, गोंदिया यांनी केले आहे.

# आ.चंद्रिकापुरे यांचे हस्ते १ कोटीच्या कामाचे भूमिपूजन

**अर्जुनी मोरगाव:** तालुक्यातील गोठणगाव जिल्हा परिषद क्षेत्र अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांचे प्रयत्नाने अनेक गावात आमदार स्थानिक विकास निधी २५१५ तसेच मनरेगा अंतर्गत विविध विकासकामे मंजूर करण्यात आले असून सदर कामांना प्रशासकीय मान्यतेसह २ कोटी रुपयाचा निधी मंजूर करण्यात आला असून १५ जून रोजी आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांच्या हस्ते विविध विकास कामाचे भूमिपूजन करण्यात आले.



यावेळी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंजि. यशवंत गणवीर, तालुकाध्यक्ष लोकपाल गहाणे, सुशीला हलमारे, पंचायत समिती सदस्य आम्रपाली डोंगरवार, चंद्रकला डोंगरवार, माजी जी.प.सदस्य रतिराम राणे, सरपंच बळीराम टेंभुर्णी, उपसरपंच हरिश्चंद्र घरत, सरपंच छाया अमले, सरपंच करणदास रक्षा, उपसरपंच ताराचंद भोगारे, सरपंच पपीता नंदेश्वर, सरपंच गणेश ताराम, सरपंच संजू इसवार, उपसरपंच दिलीप कुमार तिरपुडे, सरपंच पुष्पा डोंगरवार, सरपंच नरेंद्र लोथे, ग्रामपंचायत सदस्य ममता दोनाडकर, ओमप्रकाश दोनाडकर, यमुना मडावी ,मंगला शेंद्रे, माधव दोनाडकर, सदाशिव घुगुसकर, उपसरपंच अनिल पुस्तोडे, बिंदू ठाकरे,आदी उपस्थित होते.

# नागरिकांच्या हाताला तत्काळ कामे द्या-आमदार विनोद अग्रवाल

**गोंदिया:** मनरेगाच्या माध्यमातून स्थानिकांना रोजगार देण्याचे कार्य शासनाकडून केले जाते. तरीही स्थानिक नागरिकांना रोजगाराच्या शोधात शहराकडे धाव घ्यावी लागते. त्यामुळे नागरिकांना स्थानीय ठिकाणी रोजगार मिळवून देण्याची जबाबदारी आपली आहे. मनरेगाच्या माध्यमातून जास्तीत जास्त नागरिकांना रोजगार मिळवून द्यावे अशी सूचना आमदार विनोद अग्रवाल यांनी केली. स्थानिक पंचायत समिती सभागृहात आमदार विनोद अग्रवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत पंचायत समिती सभापती मुनेश रहांगडाले यांच्या अध्यक्षतेत ही आढावा बैठक पार पडली.

तालुक्यात सुरू असलेल्या सर्व कामांच्या आढावा या बैठकीत घेण्यात आला यामध्ये घरकुल, महाराष्ट्र जल प्राधिकरण अंतर्गत सुरु असलेले पाईपलाईनचे कामे, पांदन रस्ता खडीकरण, सिमेंट रस्ते, नाली, खडीकरण अश्या विविध विषयांवर आढावा घेण्यात आला. सिमेंट कामात योग्य ती गुणवत्ता राखण्यासाठी सुद्धा व त्यावर लक्ष ठेवण्यासाठी उपस्थित अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना सूचना केल्या. भूमिगत पाईपलाईन च्या कामामुळे अनेक रस्त्यांचे दुरावस्था झालेली बघावयास मिळते त्यामुळे या कामाला गती देऊन तात्काळ ही कामे पूर्ण करण्यात यावे अशीही सूचना आमदार विनोद अग्रवाल यांनी केली.या आढावा बैठकीला उपसभापती नीरज उपवंशी, खंड विकास अधिकारी पिंगळे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी रहांगडाले, मडावी, व मनरेगा विभागाचे तांत्रिक सहाय्यक व सर्व अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.



### ग्राम पंचायतीच्या २२ कामांच्या मर्यादेवर उपाय काढणार

**सध्या मनरेगाच्या ऑनलाइन प्रणालीनुसार एका ग्रामपंचायतीमध्ये एके वेळी केवळ २२ कामे सुरू करण्याची मर्यादा आहे. ज्या ग्रामपंचायत मध्ये २२ कामे एका वेळी सुरू आहेत अशा ग्रामपंचायतींना ब्लॅकलिस्ट करण्याची या प्रणाली द्वारे सोय केली आहे. परंतु जी कामे झाली असून त्या कामांचे बिल निघाले नाहीत अशा कामांना सुद्धा ऑनलाईन प्रणालीमध्ये सुरू असलेल्या कामात मोजणी झाल्याने नवीन कामे सुरू करता येत नाही,अशी समस्या उपस्थित अधिकाऱ्यांनी आमदार विनोद अग्रवाल यांच्यापुढे मांडली. त्यामुळे अनेक ग्रामपंचायतींना नवीन कामे सुरू करण्यासाठी अडचणी निर्माण होतात. यावर तात्काळ मनरेगा विभागाचे आयुक्ताना संपर्क करून या समस्येची जाणीव करून देत तात्काळ उपाय योजना करण्याची विनंती केली.**

# संच मान्यतेचा शासन निर्णय रद्द करा



**गोंदिया:** संच मान्यतेचा अन्यायकारक शासन निर्णय रद्द करावा व शिक्षकांच्या इतर प्रलंबित मागण्यांच्या पुर्ततेसाठी शासन, प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी १५ जून रोजी शिक्षक समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. संच मान्यतेच्या नवीन शासन निर्णयामुळे अनेक शाळातील मुख्याध्यापक पद नष्ट होणार आहे. त्यामुळे शाळांना प्रशासन प्रमुखच राहणार नाही. नव्याने लादलेल्या जाचक अटींमुळे विद्यार्थ्यांअभावी एखाद्या शाळेत शिक्षक अतिरिक्त झाला तसेच पुन्हा पटसंख्या वाढली तर त्या शाळेत नवीन शिक्षक मिळणे कठीण झाले आहे. या अन्यायकारक निर्णयामुळे गरिब कुटुंबातील मुलांना मोफ्फत शिक्षण मिळणे दुरापास्त होणार आहे. सरकारी प्राथमिक शाळा बंद होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

मुलांचा सक्तीच्या व मोफ्फत शिक्षणाचा हक्क हिरावला जाऊन खाजगी शाळांना पेव येणार. सरकारी शाळा वाचल्या पाहिजेत, टिकल्या पाहिजेत. यासाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या वतीने एक दिवसीय राज्यव्यापी धरणे आंदोलनाची हाक देण्यात आली होती. याअनुषंगाने शनिवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शिक्षकांनी धरणे आंदोलन करून आक्रोश व्यक्त केला. दरम्यान अन्यायकारक शासन निर्णय मागे घेण्यात यावा, यासह शिक्षकांच्या इतर मागण्या मान्य कराव्यात, अशी मागणी करून शासनविरोधात घोषणा दिल्या. आदोलनाचे नेतृत्व शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष संदीप तिडके यांनी केले. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष एच. एस. बिसेन, जिल्हा नेते सुरेश रहांगडले, जिल्हा सरचिटणीस संदीप मेश्राम, मार्गदर्शक एल. यू. खोब्रागडे, आर. आर. अगळे, एस. यु. वंजारी, राज्य कार्यकारणी सदस्य शरद पटले, जिल्हा कोषाध्यक्ष उत्तम टेंभरे यांच्यासह समितीचे अन्य पदाधिकारी व बहुसंख शिक्षक उपस्थित होते.

# कमिशनसाठी रोखली मजुरांची मजुरी

**निधी प्राप्त होऊन वितरण करण्यास टाळाटाळ; ग्रामसेवकावर कारवाईची मागणी**

**गोंदिया:** गोंदिया तालुक्यातील मुरपार येथील ग्रामसेवक गेल्या महिनाभरापासून निधी उपलब्ध असून केवळ कमिशनसाठी मजुरांची मजुरी देण्यास टाळाटाळ करीत असल्याचा आरोप मजुरांनी केला आहे. गेल्या महिनाभरापासून मजुरांना मजुरी न मिळाल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. या प्रकरणात आमदार व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची लक्ष देऊन ही समस्या मार्गी लावण्याची मागणी केली आहे.

गोंदिया तालुक्यातील मुरपार येथे आमदार निधीअंतर्गत तीन महिन्यांपुर्वी तीन लाख रुपयांच्या निधीतून रस्त्याचे बांधकाम करण्यात आले होते. या कामावर आठ मजुरांनी काम केले होते. कामासाठी व मजुरांना मजूरी देण्यासाठी निधीसुद्धा ग्रामपंचायतकडे महिनाभरापुर्वीच प्राप्त झाला आहे. गेल्या महिनाभरापासून मजूर मजूरी मागण्यासाठी ग्रामसेवकाकडे जात आहे. पण आधी कमिशन द्या नंतर मजूरी देतो अशी भूमिका सचिवाने घेतली असल्याचा आरोप मजूरांनी केला आहे.

प्राप्त माहितीनुसार फंडात ८१ हजार रुपये जमा आहे. पण ही रक्कम मजुरांच्या बँक खात्यावर जमा करण्यास सचिव टाळाटाळ करीत असल्याने मजुरांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. मजुरांनी या प्रकरणाची आमदार व पंचायत समितीचे खंडविकास अधिकारी यांच्याकडे तक्रार केली असून सचिवावर कारवाई करण्याची मागणी केली आहे.



**तीन महिन्यांपुर्वीच रस्त्याचे काम करण्यात आले. याचे पैसेसुद्धा मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात ग्रामपंचायतच्या सामन्य फंडात जमा करण्यात आले. मात्र सचिवाच्या कमिशनखोरीच्या धोरणामुळे मजुरांना मजूरी न मिळाल्याने उपासमारीची वेळ आली आहे.**

**यशोदा दाऊदसरे, मजूर**

**मुरपार येथील ग्रामसेवकाची तक्रार प्राप्त झाली असून तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी सुरु आहे. चौकशीत दोषी आढळल्यास निश्चित कारवाई केली जाईल.**

**आनंद पिंगळे, खंडविकास अधिकारी, गोंदिया**

# अर्थमंत्रालयाने अडवले ओबीसी वसतिगृहाचे फर्नीचर साहित्य

**निधी देण्यास सरकारची टाळाटाळ; ओबीसी संघटनांमध्ये नाराजी**

**गोंदिया :** शहरातील गणेशनगर आणि कुडवा येथे ओबीसी विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या वसतिगृहाकरिता इमारती सज्ज आहेत. परंतु, अद्याप फ्फर्निचर मिळाले नसल्याने नवीन शैक्षणिक सत्र सुरू झाले असतानाही वसतिगृह सुरू होण्याचा मुहुर्त निघाला नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांसह ओबीसी संघटनांनी सरकारच्या धोरणावर नाराजी व्यक्त केली आहे. राज्याचे अर्थमंत्री पद हे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडे असून अर्थमंत्रालय ओबीसी वसतिगृहाला लागणार्या साहित्यासह नवीन इमारतबांधकामास निधी देण्यास टाळाटाळ करीत असल्यानेच साहित्यविना ओबीसींचे राज्यातील ५५ वसतिगृह वाट बघत आहेते अशी टिका ओबीसी संघटनांनी केली आहे.

### प्रशासकीय यंत्रणेणे प्रवेशासाठी लागणारी प्रक्रिया सुरू केली

**शहराच्या गणेशनगर येथे मुलींसाठी, तर कुडवा येथे मुलांसाठी भाड्याने इमारती घेतल्या आहेत. फर्निचर व इतर साहित्यपुरवठा अद्याप झालेला नसल्याने वसतिगृह सुरु झालेले नाही, साहित्य येताच त्वरीत ओबीसींना वसतिगृहात राहता येईल असे बैठकीत समाजकल्याण उपायुक्त विनोद मोहतुरे यांनी सांगितले.**

ओबीसी विद्यार्थ्यांचे वसतिगृह आणि आधार योजनेच्या अमलबजावणी संदर्भात सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांच्यासोबत जिल्ह्यातील ओबीसी कार्यकर्त्यांनी येथील समाजकल्याण कार्यालयात बैठक घेतली.त्यात मंत्री व प्रधान सचिवांना भेटून अकरावीच्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेशाची मागणी करण्यात येईल. तसेच व्यवसायीक उच्चशिक्षणातील विद्यार्थी न मिळाल्यास त्या जागेवर अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना संधीची मागणी करण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. यावेळी ओबीसी अधिकार मंचचे संयोजक खेमेंद्र कटरे, ओबीसी युवा अधिकार मंचचे संयोजक उमेश कोर्राम, ओबीसी संघर्ष समितीचे कैलाश भेलावे,एस.यू.वंजारी,कमल हटवार, ओबीसी सेवा संघ भूमेश शेंडे,प्रमोद बघेले, पियुष आकरे, संविधान मैत्री संघाचे अतुल सतदेवे, प्रा. दिशा गेडाम, उपस्थित होते.



### वसतिगृहातील कंत्राटी पदभरतीला विरोध

**ओबीसी वसतिगृहाकरिता शासनाने जे पद मंजूर केले आहे, ते कंत्राटी असून कंत्राटी व्यक्ती योग्य ती जबाबदारी स्वीकारू शकणार नाही. विद्यार्थी-विद्यार्थिनींना काही झाल्यास त्याची जबाबदारी सांभाळण्याकरिता शासनाने वसतिगृहाचे मुख्य पद हे कंत्राटी न भरता शासकीय पद म्हणून भरावे, अशी मागणी ओबीसी अधिकार मंचचे संयोजक खेमेंद्र कटरे यांनी केली आहे.**

# वाळू चोरट्याची तहसिलदाराच्या वाहनचालकाल मारहाण

**गोंदिया:-** जिल्ह्यात वाळू घाट लिलाव बंद आहे. परिणामी अवैध वाळू चोरीला उधान आले आहे. या अवैध वाळू उत्खनन, वाहतुक, विक्रीवर प्रतिबंध बसावा यासाठी धडक कारवाई केली जात आहे. कारवाई दरम्यान आमगाव तहसीलदारांच्या वाहन चालकाला शिवीगाळ, मारहाण केल्याचा प्रकार नुकताच घडला आहे.



विना परवाना वाळूची वाहुक होताना टिप्पर क्रमांक एमएच ३५ एजे २६३५ तहसीलदार, तलाळ्याने पकडला. यावर कारवाई करून टिप्पर तहसील कार्यालय परिसरात जमा करण्यास सांगितले. दुसऱ्या दिवशी टिप्परमालक विष्णू बर्वे याने तहसील कार्यालयाजवळ तहसीलदार यांचे वाहनचालक राजू पटले यांना बोलावले. "तू माझा टिप्पर का पकडला' असे म्हणून त्याला शिवीगाळ करून मारहाण केली. एवढच नव्हे तर माझा टिप्पर ज्यांनी पकडला त्या सर्वांना पाहून घेण्याची धमकी दिली. या प्रकरणी आमगाव पोलिस स्टेशन येथे टिप्पर मालकाविरुद्ध कलम ३५३, ३३२, २९४ व ५०६ कलमा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून याप्रकरणी आमगाव पोलीस तपास करीत आहे. दरम्यान वाळू माफीयांची दादागीरी वाढतच असून महसूल कर्मचाऱ्यांमध्ये भिती आहे. प्रशासनाने वाळू माफियावर कारवाई करावी, अशी मागणी तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी उपविभागीय पोलिस अधिकारी मडामे यांना निवेदनाद्वारे केली आहे.